दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बडूभाऊ इगोले

वाशीम ■ सोमवार दिनांक 26 मे 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 02 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL03935

# राज्यात पावसाचे धूमशान!

- १२ दिवसआधीच महाराष्ट्रात मान्सूनचे आगमन
- यंदा सरासरीपेक्षा अधिक पाऊस असणार
- पुण्याला पावसाने झोडपले, बारामतीमध्ये अतिवृष्टी
- रस्त्यांना नद्यांचे स्वरूप
- पालघरमध्ये भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान
- उजनी धरणाची पाणीपातळी ४ टीएमसीने वाढली
- साताऱ्यात माण नदीने ओलांडली धोक्याची पातळी

**मुंबई/पुणे/सातारा/सोलापूर**

**गेल्या काही दिवसांपासून मान्सूनपूर्व अवकाळी पावसाने राज्याला झोडपले असतानाच, तब्बल १२ दिवस आधीच मान्सूनचे राज्यात आगमन झाले आहे. पुढील एक दोन दिवसांत मुंबईत पावसाचे आगमन होईल, असा अंदाज कुलाबा हवामान विभागाने वर्तवला आहे. मात्र मान्सूनने मे महिन्यातच एंट्री घेत राज्यात धूमशान घालायला सुरुवात केली आहे. पुणे, सोलापूर, नाशिक, सातारा येथे पावसामुळे शेतमालाचे प्रचंड नुकसान झाले आहे. पालघर जिल्ह्यात पावसामुळे उन्हाळी भातशेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. केरळमध्ये आठ दिवस आधीच मान्सूनचे आगमन झाल्यानंतर महाराष्ट्रात पोहोचण्यासाठी आणखी दोन ते तीन दिवस लागतील, असा अंदाज होता. मात्र मान्सूनच्या पुढील वाटचालीसाठी अनुकूल वातावरण असल्यामुळे एका दिवसातच गोव्याची वेस ओलांडून महाराष्ट्रात दाखल झाला.** संमिश्र पानावर



## राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार

दरम्यान, अरबी समुद्रात सध्या कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विशेषत: कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे तसेच कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांच्या काही भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय पुणे, मुंबई, ठाणे, पालघर, नांदेड, लातूर आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये पावसाचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे, तर मुंबई आणि ठाण्याला पावसाचा यलो अलर्टही जारी करण्यात आला आहे. अलिबागमधील अनेक समुद्रकिनारे रविवार असूनही ओस पडले आहेत.



# 'ऑपरेशन सिंदूर' हे बदलत्या भारताचे चित्र

## 'मन की बात'मध्ये पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन



**नवी दिल्ली :** 'ऑपरेशन सिंदूर'ही केवळ सैन्य मोहीम नव्हती तर बदलत्या भारताचे चित्र होते. जे जागतिक स्तरावर भारताचा संकल्प, साहस व वाढती ताकद दाखवते, असे प्रतिपादन 'मन की बात'मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले.

'मन की बात' या दरमहा रेडियोच्या कार्यक्रमातून राष्ट्राला संबोधित करताना मोदी म्हणाले की, संपूर्ण देश आज दहशतवादाविरोधात एकत्र झाला आहे. त्याच्या मनात राग आहे. 'ऑपरेशन सिंदूर' हे दहशतवादाविरोधात जागतिक लढाईत एक महत्त्वाचा टप्पा आहे. त्यातून भारताची वाढती क्षमता व उद्देश दिसून येतो. त्यामुळे नवीन आत्मविश्वास व ऊर्जा मिळाला आहे. सीमापलीकडे दहशतवादी तळावर संमिश्र पानावर

## वादग्रस्त विधाने टाळा; पंतप्रधानांचे नेत्यांना आदेश

भाजपच्या नेत्यांनी वादग्रस्त विधाने टाळावीत. सार्वजनिक जीवनात बोलण्यावर मर्यादा राखणे गरजेचे आहे. प्रत्येक मुद्द्यावर नेत्यांनी बोलले पाहिजे असे नाही, अशा शब्दांत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पक्षाच्या नेत्यांना आदेश दिला. पंतप्रधान मोदी यांनी रविवारी रालोआच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांची बैठक घेतली. या बैठकीला केंद्रीय मंत्री अमित शहा, संरक्षण मंत्री राजनाथ सिंह उपस्थित होते. तसेच १९ मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री उपस्थित होते. सूत्रांनी सांगितले की, पक्षाच्या काही नेत्यांच्या वक्तव्यामुळे पंतप्रधान नाराज आहेत. वादग्रस्त बोलण्यामुळे संमिश्र पानावर

## निवडक

### गाझात इस्रायलच्या हल्ल्यात १४ ठार

**देर-अल-बलाह :** इस्रायली हवाई दलाने गाझात केलेल्या हल्ल्यात १४ जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये आई व दोन मुलांचा समावेश आहे, अशी माहिती स्थानिक आरोग्य खात्याच्या सूत्रांनी दिली. गाझातील शहर देर-अल-बलाहवर एका तंबूवर इस्रायलने हवाई हल्ले केले. जास्त लोकसंख्या भागातून 'हमास' आपल्या कारवाया करत आहे, असा आरोप इस्रायलने केला.

### चार राज्यांमध्ये १९ जूनला पोटनिवडणूक

**नवी दिल्ली :** केंद्रीय निवडणूक आयोगाने रविवारी गुजरात, केरळ, पंजाब आणि पश्चिम बंगालमधील विधानसभा पोटनिवडणुकांचा कार्यक्रम जाहीर केला. या चार राज्यांमधील पाच रिक्त विधानसभा जागांसाठी १९ जून रोजी पोटनिवडणुका होणार असून निकाल २३ जूनला लागणार आहे. गुजरातमधील कडी आणि विसावदर या दोन मतदारसंघात तसेच केरळमधील निलांबूर आणि पंजाबमधील लुधियाना पश्चिम व पश्चिम बंगालमधील कालिगंज विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणुका होणार आहेत.

### ठाण्यात रविवारी कोरोनाचे ११ रुग्ण आढळले

**ठाणे :** ठाण्यात शनिवारी कोरोनाचा पहिला बळी गेला असतानाच, रविवारी नव्या ११ रुग्णांची नोंद झाली आहे. त्यामुळे ठाणे शहरातील कोरोना रुग्णांची संख्या ३० वर पोहोचली आहे. कोरोनाच्या सात रुग्णांवर उपचार सुरू असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. यापैकी २२ रुग्णांमध्ये कोरोनाची सौम्य लक्षणे असल्यामुळे त्यांच्यावर घरीच उपचार सुरू आहेत. देशातही गेल्या २४ तासांत कोरोनामुळे २ जणांचा मृत्यू झाला असून २७ नवीन रुग्ण सापडले आहेत.

### ताजमहालच्या सुरक्षेसाठी ड्रोनविरोधी यंत्रणा

**आग्रा :** उत्तर प्रदेशातील आग्रा येथील ताजमहालच्या सुरक्षेसाठी ड्रोनविरोधी यंत्रणा लावण्यात येणार आहे. तसेच कोणत्याही हवाई हल्ल्यापासून याचे संरक्षण करण्यासाठी भक्कम सुरक्षा केली जाईल. सध्या ताजमहालच्या सुरक्षेची जबाबदारी सीआयएसएफ व उत्तर प्रदेश पोलिसांकडे आहे. आता ड्रोन रोखणारी यंत्रणाही तैनात केली जाईल, अशी माहिती एका अधिकाऱ्याने दिली.

# हिंदू समाज सशक्त झाल्यावर भारतही मजबूत होईल

## आरएसएसचे प्रमुख मोहन भागवत यांचे प्रतिपादन



**नवी दिल्ली :** जरभारतातील हिंदू समाज मजबूत झाला, तरच जगभरातील हिंदूंना आपोआप बळ मिळेल. हे काम चालू आहे, पण अद्याप पूर्ण झालेले नाही. हळूहळू पण निश्चितच, ती परिस्थिती येणार आहे. हिंदू समाज व भारत एकमेकांशी घट्ट जोडलेले आहेत. त्यांची मुळं खूप खोल आणि घट्ट आहेत. हिंदू समाज सशक्त होईल तेव्हाच भारतही मजबूत होईल आणि त्यातून भारताला सन्मान मिळेल, भारताची दखल घेतली जाईल, असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांनी केले.

आरएसएसचे मुखपत्र 'ऑर्गनायझर वीकली'ला दिलेल्या विशेष मुलाखतीत मोहन भागवत म्हणाले की, "यावेळीबांगलादेशात हिंदूंवर संमिश्र पानावर

## प्रेमप्रकरणाच्या कबुलीने तेजप्रतापांची हकालपट्टी



**पाटणा :** राजद प्रमुख लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजप्रताप यादव यांनी शनिवारी दिलेल्या प्रेमप्रकरणाच्या कबुलीमुळे ते स्वतःच अडचणीत आले आहेत. या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन लालूप्रसाद यादव यांनी तेजप्रताप यांची पक्षातून हकालपट्टी केली असून कौटुंबिक संबंधही तोडले आहेत. सोशल मीडियावरून संमिश्र पानावर

# भारताची अर्थव्यवस्था जगात चौथी

**जपानला टाकले मागे**



**नवी दिल्ली :** भारताच्या अर्थव्यवस्थेची घोडदौड वेगाने सुरू आहे. जपानला मागे टाकून भारताची अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकाची बनली आहे. आता भारताच्या पुढे केवळ अमेरिका, चीन व जर्मनी या तीन अर्थव्यवस्था आहेत.

नीती आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या बैठकीनंतर नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रह्मण्यम म्हणाले की, भारतासाठी चांगले वातावरण असून देशाची आर्थिक स्थिती मजबूत आहे. आर्थिक धोरणांमुळे भारताने हे स्थान मिळवले आहे, असे त्यांनी सांगितले.

आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीचा हवाला देऊन सुब्रह्मण्यम म्हणाले की, भारत आता चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था बनली आहे. आता भारत ४ ट्रिलीयन डॉलरची अर्थव्यवस्था बनली आहे. आता भारताने जपानला मागे टाकले आहे. अमेरिका, चीन आणि जर्मनी हे भारतापेक्षा मोठे आहेत, असे त्यांनी सांगितले.


नीती आयोगाचे सीईओ म्हणाले की, आपण आपल्या धोरणावर कायम राहिल्यास तर येत्या अडीच ते तीन वर्षांत आपण तिसरी अर्थव्यवस्था बनू, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# ५४० शिक्षकांची भ्रष्ट मार्गाने भरती

**नागपूर :** राज्यातील ५४० शिक्षकांची भ्रष्ट मार्गाने भरती झाली आहे, असा ठपका 'शालार्थ आयडी' घोटाळ्याचा तपास करणाऱ्या विशेष तपास पथकाने (एसआयटी) ठेवला आहे. सरकारी प्रक्रिया न राबवता शिक्षकांची भरती केल्याचे आढळले आहे. हा घोटाळा १०० कोटी रुपयांचा आहे, असेही एसआयटीने सांगितले.

'शालार्थ' हे राज्य सरकारचे मध्यवर्ती पोर्टल आहे. यात सरकारी अनुदानित शाळेच्या कर्मचाऱ्यांची माहिती त्यात असते. ६२२ शिक्षकांची नियुक्ती झाली. त्यातील केवळ ७५ शिक्षकांची नियुक्ती प्रक्रियेनुसार झाली. ५४७ शिक्षकांची नेमणूक बनावट आयडीने करण्यात आली. त्यासाठी २० ते ३० लाख रुपये घेण्यात आले, असे पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. विशेष तपास पथकाच्या प्रभारी सुनीता मेश्राम म्हणाल्या की, शिक्षण विभागातील उपसंचालकांव्यतिरिक्त, तपास शिक्षण अधिकारी आणि शिक्षकांवर लक्ष आहे.

## केरळमध्ये मालवाहू जहाज बुडाले



**थिरुवनंतपुरम : केरळच्या समुद्रकिनाऱ्याजवळ लायबेरियाचे एमएससी एल्सा-३ हे मालवाहू जहाज बुडाले. या जहाजात कॅल्शियम कार्बाईडसारख्या घातक कंटेनर्ससह सुमारे ८४ मेट्रिक टन डिझेल असल्याने मोठ्या पर्यावरणीय संकटाची शक्यता निर्माण झाली आहे. भारतीय तटरक्षक दल आणि नौदलाने जहाजावरील सर्व २४ क्रू मेंबर्सना वाचवले. जहाजावर असलेल्या २४ खलाशांपैकी २१ जणांना आधीच वाचवण्यात आले होते. उर्वरित तीन जण कंपनीच्या सूचनेनुसार जहाजावरच थांबले होते, त्यांना भारतीय नौसेनेच्या आयएनएस सुजाता या जहाजाच्या सहाय्याने सुखरूप वाचवण्यात आले.**

# पाकिस्तानपासून भारताला धोका

## अण्वस्त्र साठ्यांचे आधुनिकीकरण जोरात; अमेरिकेचा गुप्त अहवाल

**इस्लामाबाद :** भारताने राबवलेल्या 'ऑपरेशनसिंदूर'नंतर पाकिस्तानला माघार घ्यावी लागली. भारताने पाकिस्तानात जाऊन दहशतवादी तळ उद्ध्वस्त केले. तरीही पाकिस्तानची खोड मोडलेली दिसत नाही. पाकिस्तानने आपल्या अण्वस्त्र साठ्यांचे आधुनिकीकरण जोरात सुरू केले आहे, असा धक्कादायक निष्कर्ष आपल्या गुप्त अहवालात अमेरिकेने नमूद केला.

२२ एप्रिलला पहलगामला पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. त्यानंतर भारतीय सैन्य दलाने 'ऑपरेशन सिंदूर' राबवले. यात दहशतवादी तळांसह पाकिस्तानच्या प्रमुख हवाई तळांना लक्ष्य केले होते. आता पाकिस्तानने भारतासमोर आव्हान उभे करण्यासाठी अण्वस्त्रांचे आधुनिकीकरण करण्यास सुरुवात केली.

अमेरिकेच्या गुप्तचर विभागाच्या गोपनीय अहवालानुसार, पाकिस्तान त्याच्याकडील अण्वस्त्रांच्या साठ्याचे वेगाने आधुनिकीकरण करत आहे. तसेच पाकिस्तान संमिश्र पानावर

**आयटीएमएस प्रणालीचे परिणाम**

# मुंबई-पुणे महामार्गावरील अपघात घटले




**मुंबई :** मुंबई ते पुणे दरम्यानच्या देशातील पहिला द्रुतगती महामार्गावरील वाढते अपघात टाळण्यासाठी बुद्धिमान वाहतूक व्यवस्थापन प्रणालीमुळे (आयटीएमसी) अपघातांचे प्रमाण कमी झाले आहे.

गेल्या चार महिन्यांत मुंबई ते पुणे महामार्गावरील अपघातात मृतांची संख्या घटली आहे. मुंबई-पुणे महामार्गावर यंदा जानेवारी ते एप्रिल दरम्यान ११ जणांचा मृत्यू झाला तर समृद्धी महामार्गावर याच कालावधीत ५५ जणांचा मृत्यू झाल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

महाराष्ट्र महामार्ग पोलिसांनी सांगितले की, जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर १० भीषण अपघात झाले. त्यात ११ जणांचा मृत्यू झाला. याच कालावधीत मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर ४७ अपघात झाले, ज्यात ५५ लोकांनी प्राण गमावले.

मुंबई-पुणे महामार्गावर गेल्या काही वर्षांत अपघातांचे प्रमाण वाढले होते. लेन कटिंग, भरधाव वेग आदींमुळे अनेकांचे बळी जात होते. त्यामुळे या द्रुतगती महामार्गाच्या व्यवस्थापनावर टीका होत होती.

राज्य संमिश्र पानावर



### समृद्धीवरही हीच प्रणाली बसवणार

२०२४ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर एकूण १९१ अपघात झाले. त्यापैकी ७४ भीषण होते आणि त्यात ९० जणांचा मृत्यू झाला. समृद्धी महामार्गावर १३७ अपघात नोंदवले गेले, त्यापैकी ९६ भीषण अपघात होते आणि १२६ जणांचा मृत्यू झाला, असे अधिकृत आकडेवारीत नमूद आहे.

# रशियाचे युक्रेनवर तीव्र हल्ले; १३ जणांचा मृत्यू

**मॉस्को :** रशिया-युक्रेनमध्ये कैद्यांची अदलाबदल होत असतानाच रशियाने युक्रेनवर ३६७ ड्रोन व क्षेपणास्त्रांचा हल्ला केला. या हल्ल्यामुळे युक्रेनचे मोठे नुकसान झाले. दोन्ही देशांमध्ये युद्ध सुरू झाल्यानंतर आतापर्यंतचा हा सर्वात मोठा हवाई हल्ला आहे. या हल्ल्यात १३ जणांचा मृत्यू झाला असून त्यात तीन मुलांचा समावेश आहे, तर अनेकजण जखमी झाले.

युक्रेनने दावा केला की, त्यांच्या हवाई दलाने रशियाचे २६६ ड्रोन व ४५ क्षेपणास्त्रे उडवली. या हल्ल्यात अनेक इमारतींचे नुकसान झाले. रशिया युक्रेनवर बॅलेस्टिक क्षेपणास्त्राचा संमिश्र पानावर



## राष्ट्रपती पुतीन थोडक्यात बचावले; हेलिकॉप्टर पाडण्याचा प्रयत्न अयशस्वी



रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन हे थोडक्यात बचावले आहेत. पुतीन यांचे हेलिकॉप्टर पाडण्याचा प्रयत्न युक्रेनने केला, असा दावा रशियाने केला आहे. रशियन हवाई दलाचे मेजर जनरल युरी डॅशकिन यांनी सांगितले की, पुतीन हे २० मे रोजी कुर्स्कच्या दौऱ्यावर गेले होते. याचवेळी युक्रेनी हवाई दलाने पुतीन यांच्या हेलिकॉप्टरवर ४६ ड्रोनने हल्ले केले. पण, आम्ही सगळे ड्रोन उडवले. आम्ही राष्ट्रपतींना सुरक्षित ठेवले.

## संपादकीय

## 'मसाप' : १२० वर्षांच्या वाटचालीची समृद्ध कहाणी

कालपटलावरची ११९ वर्षे सरली आहेत. या शतकाने अनेक चढ-उतार पाहिले. देशाचा स्वातंत्र्य लढा, सामाजिक समतेसाठी-बंधुतेसाठी चाललेल्या चळवळी, स्त्री शिक्षण, रुढी परंपरांच्या जोखडातून मुक्त होण्याचे प्रयास इथपासून ते आजच्या अनेक चांगल्या वाईट बदलांची साक्ष देणाऱ्या संगणकीय क्रांतीच्या युगापर्यंतची ही वाटचाल. या वाटचालीत साहित्यिकांच्या आधुनिक उदारमतवादी विचारांचा आणि त्यातून निर्माण झालेल्या साहित्याचा मोठा प्रभाव समाजमनावर पडला. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात न्यायमूर्ती रानडे व लोकहितवादी यांनी ग्रंथकार संमेलनाची सुरुवात केली होती. समाजहिताच्या दृष्टीने वैचारिक आदान-प्रदान व्हावे, तसेच साहित्य परंपरा टिकून राहावी हा त्यामागचा उद्देश. चौथे ग्रंथकार संमेलन २७ मे १९०६ रोजी मळेकर वाड्यात भरले होते. प्रसिद्ध कवी गोविंद वासुदेव कानिटकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. या संमेलनाच्या समारोपप्रसंगी साहित्य सम्राट न. चिं. केळकर यांनी महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या स्थापनेची घोषणा केली. लोकमान्य टिळकांनी त्याला अनुमोदन दिले आणि महाराष्ट्राच्या साहित्यिक, सांस्कृतिक जडण घडणीचा, संवर्धनाचा जणू पायाच रचला गेला. या नंतरच्या १२० वर्षांच्या कालखंडात महाराष्ट्र साहित्य परिषदेने (मसाप) हा वारसा अतिशय कसोशीने जपला, संवर्धित केला. मराठी साहित्य संमेलनांचे आयोजन ही अतिशय वेगळी संकल्पना महाराष्ट्र साहित्य परिषदेने यशस्वी करून दाखवली. आतापर्यंत झालेल्या ९८ साहित्य संमेलनांपैकी पहिली ४५ संमेलने महाराष्ट्र साहित्य संमेलन या नावाने महाराष्ट्र साहित्य परिषदेने भरविली होती. पुढे १९६० साली अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाची स्थापना झाल्यावर ही संमेलने अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन या नावाने आयोजित केली जातात. साहित्य संमेलनाची अशी दीर्घ आणि समृद्ध परंपरा मराठी भाषेतच आढळते. पुण्यातील महाराष्ट्र साहित्य परिषद ही महाराष्ट्रातील आद्य साहित्य संस्था. या संस्थेच्या स्थापनेपासून ते आजवर परिषदेने साहित्य सेवेची आपली परंपरा अखंडीत चालू ठेवली आहे. गेल्या दोन दशकात तर परिषदेत अनेक चांगले बदल घडून आले आहेत. अधिकाधिक लेखक, कवी, वाचक, रसिक परिषदेशी जोडले जात आहेत. फक्त पुण्यातच नाही तर लहान-लहान गावांतील साहित्यिकांपर्यंत पोहोचण्यासाठी, त्यांना बळ देण्यासाठी परिषद कटिबद्ध आहे. परिषदेच्या कार्यक्षेत्रातील १६ जिल्ह्यांतील गावांमध्ये परिषदेच्या शाखा आहेत. त्यांच्या मार्फत अनेक उपक्रम घेतले जातात. शिवार संमेलनांची कल्पना तर अतिशय यशस्वी आणि लोकप्रिय झाली आहे. परिषदेकडे मोठ्या विश्वासाने पुरस्कार देण्यासाठी अनेक देणग्या सुपुर्द केल्या जातात. या पुरस्कारांसाठी योग्य व्यक्तीची निवड करून त्यांना पुरस्काराने गौरविले जाते. मराठी भाषेची गळचेपी होऊ नये, तसेच महाराष्ट्रातच मराठी उपेक्षित राहू नये, यासाठी महाराष्ट्रात मराठी भाषा शिक्षणाचा कायदा सक्तीचा करावा, यासाठी मुंबईतील आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनात साहित्य परिषदेचा महत्वपूर्ण सहभाग होता. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा, यासाठी परिषदेने सातत्याने पाठपुरावा केला. पंतप्रधान कार्यालयाला शालेय विद्यार्थ्यांद्वारे एक लाख पत्रे पाठवणे, सततचा पत्रव्यवहार, दिल्लीत धरणे आंदोलन अशा अनेक मार्गांचा वापर करून आपली मागणी सरकारसमोर प्रभावीपणे मांडली. मराठी भाषेच्या प्रसार व वृद्धीसाठी परिषदेतर्फे मराठी भाषेचे वर्ग व परीक्षा घेतल्या जातात. साहित्य परिषदेचे अतिशय महत्त्वाचे कार्य म्हणजे मराठी वाङ्मयाचा इतिहास सात खंडांमध्ये प्रकाशित करून आपल्या अमूल्य साहित्यिक व सांस्कृतिक ठेव्याचे जतन परिषदेने केले. बदलत्या काळाला अनुसरून हे खंड ई-बुक स्वरूपातही आणले आहेत. परिषदेच्या वास्तूच्या नूतनीकरणाचे काम कार्याध्यक्ष मिलिंद जोशी यांच्यासह कोशाध्यक्ष सुनिताराजे पवार, प्रमुख कार्यवाह प्रकाश पायगुडे आणि सर्व कार्यकारी मंडळाने यशस्वी केले. येत्या तीन वर्षांसाठी साहित्य महामंडळाचे कार्यालय पुण्याकडे आले आहे. ९९, १०० आणि १०१ वे साहित्यसंमेलन आयोजित करण्याची संधी महाराष्ट्र साहित्य परिषदेला मिळणार आहे. सकस साहित्यातून निरोगी समाजमने घडविण्याच्या उद्दिष्टाचा प्रभाव या साहित्य संमेलनांवर नक्की दिसेल आणि साहित्याच्या या समृद्ध आणि वैभवी परंपरेचा वारसा परिषद समर्थपणे पुढे नेईल, याची खात्री वाटते.

# स्वच्छता तिथे देवत्वस्वच्छता तिथे देवत्व

महाराष्ट्र जीत

भारत हा जगात लोकसंख्येच्या बाबतीत क्रमांक दोन वर असला तरी तो क्रमांक एक च्या उंबरवठ्यावर आहे. इथे स्वच्छता ही लोकांच्या आरोग्यासाठी महत्वाची ठरते. शासनाची यंत्रणा तोकडी असली तरी प्रत्येक नागरिकाचे हे परम कर्तव्य आहे की, त्याने स्वतः स्वच्छतेचे महत्व समजुन घेत इतरांना स्वच्छतेबाबत पटवून दिले पाहिजे.

संत तुकाराम महाराज म्हणतात, 'मन हा मोगरा अर्पुनी ईश्वरा| पुनरपी संसारा येणे नाही ॥ साधुसंतांनी मनाच्या, चित्ताच्या स्वच्छतेबाबत आपल्या अभंगातून जागृती केली आहे. आयुष्य सुङ्गल व्हायचे असेल तर मन, काया आणि आपला परिसरही तेवढाच स्वच्छ राखला पाहीजे. हाच तर आपल्या जगण्याचा सुखी मार्ग माणसाच्या जीवनातील सर्वांत महत्वाची कुठली गोष्ट असेल तर ती स्वच्छता. मग ती मनाची असो, शरीराची, आपल्या घराची, आजुबाजुच्या परीसराची, अगदी राष्ट्रसेवेच्या भावनेतून जागलेली स्वच्छ भारताची. स्वच्छता हा देवत्वाकडे जाण्याचा मार्ग आहे. देवत्वाकडे जाण्याचा अर्थ देव होणे नव्हे तर मनाच्या, शरीराच्या, आपल्या परिसराच्या स्वच्छतेमुळे निरोगी जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोण होय. सर्व गोष्टींसाठी पैसा, धन लागते. परंतु स्वच्छता ही अशी गोष्ट आहे जी स्वतः करायची असते आणि ती पैशांशिवाय करणे सहज शक्य आहे. कारण निसर्गाने आपल्याला सूर्याची तेजस्वी किरणे, जलस्त्रोत बहाल केले आहेत. ज्याप्रमाणे आपण आपल्या शरीराची स्वच्छता करतो, म्हणजे केलीच पाहीजे. त्याचप्रमाणे आपल्या परिसराची स्वच्छता हे आपले कर्तव्य आहे. निदान जे कुणी साङ्ग-सङ्गाई करतात त्यांना सहकार्य करणे हे तर आपल्या हातात असते. आपण बरेचदा



निरीक्षण नक्कीच केले असेल.

एखाद्या इस्पितळात किंवा सार्वजनिक ठिकाणी साङ्गसङ्गाई चाललेली असते. ती व्यक्ती पोटासाठी हे काम करते. परंतु साङ्गसङ्गाई करीत असताना आपण त्याकडे दुर्लक्ष करून चालत असतो. जरा जाणिवेने चाललात तर ङ्गरशी खराब होणार नाही आणि जी व्यक्ती काम करते तिलाही तिच्या कामाची कदर केल्यामुळे समाधान लाभेल. सकाळच्या वेळी रस्ते-गल्ल्यांमध्ये सङ्गाई कामगार साङ्गसङ्गाईचे काम करीत असतात. तेव्हा एवढे भान असणे गरजेचे आहे की, जी साङ्गसङ्गाई चालली आहे ती आपल्यासाठी. विचार करा, शहरांमध्ये जर दोन दिवस साङ्गसङ्गाईच झाली नाही तर चित्र काय दिसेल? काही दिवसांपूर्वी सङ्गाई कामगारांचा संप झाला तेव्हा मार्केट परिसर दुर्गंधीने भरला होता. आपला परिसर साङ्ग ठेवणे हे केवळ सङ्गाई कामकागारांचेच काम नव्हे तर परिसर अधिक घाण होऊ देऊ नये हे आपले नागरिकांचे कर्तव्य आहे. आपण सहजच कचरा ङ्गेकत असतो. कुठलेही भान न ठेवता. बाटल्या, कागद सहज ङ्गेकतो. बाहेरच्या देशांमधली थोरवी आपण गातो. आणि आपल्याच देशात घाण करतो. आपल्यात आणि विदेशी लोकांमध्ये काय ङ्गरक आहे स्वच्छतेबद्दल हे परवाच अनुभवायला मिळाले. १८ जून रोडवरच्या एका दुकानात विदेशी जोडपे आपल्या किशोरवयीत मुलांसमवेत शीतपेय घेत होते. तिथे भारतीय पर्यटक पण होते. आपल्या गोमंतकीयांना स्वच्छतेची जाणीव आहे. त्यामुळे आपण सहसा भान ठेऊन वागत असतो. तर शीतपेय प्याल्यावर त्या मुलांनी कचरापेटीत व्यवस्थित रिकामे पेले टाकले. तर आपल्याच भारतीय जोडप्याने कचरापेटी असूनही सवयीप्रमाणे अगदी रस्त्यालगतच टाकून दिले. त्या किशोरवयीन मुलांनी ते रिकामे पेले अलगद उचलून कचरापेटीत टाकले. हे त्या जोडप्याच्या लक्षात आले असूनही आभार मानण्याचे सौजन्यही त्यांनी दाखविले नाही. हेच चित्र दाखवायचे का आपण आपल्या अतिथींना? आणि भारतीय संस्कृतीचा बडेजाव सांगताना 'अतिथी देवो भव'ची संकल्पना आपण मांडतो. कशासाठी? मोठेपणासाठी? असे म्हणतात, 'जिथे स्वच्छता तिथे देवत्व वसते'. स्वच्छता राखली तर निरोगी परीसर आपल्याला मिळेल आणि निरोगी जीवनामुळे आपण अधिक चांगल्या पध्दतीने काम करू शकू. इतर राज्यांच्या तुलनेत त्या मानाने आपण आपला गोवा स्वच्छ राखण्यात हातभार लावला आहे. एका बाजुला जिथे सकाळच्या वेळी सङ्गाई कामगार काम करतात तर दुसऱ्या बाजुला बरीचशी लोकं कामाला, ऑङ्गिसला, मुलांना शाळेत पोचवायला जाताना कचऱ्याची पिशवी घेऊन जातात आणि वाटेत कुठेतरी लपून छपून रस्त्याच्या कडेला किंवा नदी नाल्यात हा कचरा टाकतात. विचार करा, हाच कचरा पुन्हा कुणीतरी आणून तुमच्या दारात टाकला तर? आणि असं होतंही बरं का!!! हल्लीची तरूण मंडळी अशा बाबतीत खूपच जागरूक असतात. मागे एकदा मांडवी पुलावरून जाताना पाहिलेले दृष्य आठवले. एक बाई स्कुटरवरून आली. थोडावेळ रेंगाळली आणि कुणी पाहात नाही ते बघून कचरा मांडवीत ङ्गेकण्यास सज्ज झाली. इतक्यात एका तरूणाने त्या बाईला अडवले. त्या बाईला गुर्मी एवढी की मानायलाच तयार नाही. हे होईस्तोवर पुलावर गल्ला झाला आणि त्या बाईला सर्वांना तोंड द्यावे लागले. असे जागरूक नागरिक असल्यास आपल्या देशाचे भवितव्य चांगलेच असणार. आपण हमरस्त्यावरील कडेला पाहिल्यास लक्षात येईल की लोकं जाता जाता सहजच कचरा ङ्गेकून जातात. खरं तर कचऱ्याचे नियोजन योग्य रीतीने व्हावे यासाठी सरकारी यंत्रणा पंचायत स्तरापासून कार्यरत आहे. तरीही असंवेदनशील वृत्तीचे लोक आपला मनमानी कारभार चालवतातच. ग्रामीण भाग सोडल्यास आता सगळीकडेच सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यात आले आहेत. जे असा कचरा टाकतात, त्यांनी सांभाळून वागावे. अजून एक सर्वात प्रखरतेने भेडसावणारा प्रश्न म्हणजे शौचालयांचा. काही दिवसांपूर्वी भूमी पेडणेकर आणि अक्षयकुमार यांचा टॉयलेट हा चित्रपट येऊन गेला. शौचालय का असावे हे मनोरंजनाच्या माध्यमातून जागृती करणारा हा चित्रपट. आजही शौचालये असूनही उघड्यावर जाणारी लोकं आहेत, ज्यांना स्वच्छतेचा कानमंत्र कळला नाही. गेल्या वर्षी कला आणि संस्कृती संचालनालय आयोजित डी. डी. कोसंबी विचार महोत्सवात मिस्टर टॉयलेट नावाने जगभर ओळखले जाणारे जॅक सीम यांचे व्याख्यान झाले होते. जगभर ङ्गिरून या महत्वाच्या प्रश्नावर जॅक सीम यांनी अभ्यासू वृत्तीने आढावा घेतला होता. आपला भारतच नव्हे तर आशिया खंडातील कितीतरी देशांमध्ये शौचालयांची पुरेशी व्यवस्था नाही. जॅक सीम हे खरे तर उद्योजक. आशिया खंडात प्रवास करताना त्याला या समस्येची जाणीव झाली व पुढे समाजाप्रती कर्तव्य भावनेने शौचालये प्रत्येक घरासाठी असावे या दृष्टीने जागृती करण्यास सुरूवात केली. याचाच भाग म्हणून नोव्हेंबरच्या १९ तारखेला दरवर्षी 'जागतिक टॉयलेट दिवस' साजरा केला जातो. अजुन एक सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे, जी बोलली जात नाही परंतु ती बोलली पाहिजे. २८ मे रोजी 'जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिवस' मनवला जातो. या माध्यमातून महिलांमध्ये स्वच्छतेबाबत जागृती करणे हाच उद्देश होय. बडोद्याच्या स्वाती बेडेकर गावागावात, खेडोपाड्यात, आदिवासींमध्ये जाऊन मासिक पाळी स्वच्छतेबाबत जागृती करतात. एवढेच नव्हे तर कमी दरात सॅनिटरी नॅपकिन्स् कसे करायचे याविषयी मार्गदर्शन करतात. आपण देवळं मंदिरांमध्ये प्रवेश करण्याच्या गोष्टी बोलतो मग स्वच्छतेबद्दल बोलायला नको? बाणावली येथील एक तरुण क्लिटंन वाझ हा कचरा नियोजनाचा व्यवसाय करतो. अभियंता असलेला हा तरुण गोवा कचरामुक्त करण्याच्या भावनेतून काम करतो. आता त्याने हा आपला व्यवसाय केला आहे. घराघरातून कचरा गोळा करून त्याचे कामगार या कचऱ्याची विल्हेवाट लावतात. त्याच्या मते सगळ्यात मोठी समस्या आहे ती सॅनिटरी पॅडस्च्या कचऱ्याची. घराघरातून कचरा गोळा करताना हाही कचरा येतोच. एवढेच नव्हे तर रस्त्याच्या कडेलाही हा कचरा सर्रास टाकला जातो. खरं तर अशा कचऱ्याची घरच्या घरीही आपण विल्हेवाट लावू शकतो.कचऱ्याची विल्हेवाट किंवा स्वच्छतेसंदर्भात काम करणारा आणखी एक तरुण म्हणजे डॉ. सैल. वैद्यकीय पेशा असूनही वैद्यकीय आस्थापने, औषधालये इ. ठिकाणच्या कचऱ्याचे नियोजन करण्याचा संकल्प त्यांनी केला आहे. बऱ्याच जणांचे म्हणणे असते, आपण आपला गोवा स्वच्छ ठेवतो. परंतु बाहेरचे येऊन इथे घाण करतात. हल्लीच एका वर्तमानपत्रावर रस्त्याच्या कडेला स्वयंपाक करणाऱ्या पर्यटकांचे छायाचित्र पाहिले. एका दुकानात या छायाचित्रावर बरीच चर्चा चालली होती. बाहेरचे लोक येऊन गोवा कसे घाण करतात, यावर बोलले जात होते. इतक्यात त्यातील एक जण म्हणाला, 'आपले लोक काही कमी नाहीत. मुरडेश्वर, महालक्ष्मी कोल्हापूर, पंढरपूर, शिर्डीला जाणारी आपली लोकं तिथे जाऊन हेच करतात'. धार्मिक, सामाजिक स्थळे हा आपलाच परीसर आहे, हे आपण मनापासून मानले तर आपला देश स्वच्छतेच्या बाबतीत अग्रेसर असेल. मग कुणी आपल्या राज्याला, देशाला नावं ठेवणार नाही. गरीबीने ग्रासलेल्या आपला देशाला अस्वच्छतेचा ठपका बसला आहे. आपण घरातच स्वच्छतेचे नियम पाळलेत तर स्वच्छता अभियान व्यवस्थितपणे तडीस नेऊ. जॅक सीमने आपल्या व्याख्यानात भारत अस्वच्छतेबाबत अग्रेसर असल्याचे सांगितले तेव्हा अनेकांना खटकले होते. कारण आपण आपल्या देशावर मनापासून प्रेम करतो. म्हणूनच स्वच्छता हीच सेवा मानून आपल्या घरातला कचरा तरी नदीनाल्यात, हमरस्त्यावर आपण यापुढे टाकणार नाहीत याची काळजी घेणे गरजेचे आहे.

**शब्दसंकलन**
**महादेव वि. हरणे**
**पत्रकार ( दै. महाराष्ट्र जित )**
**मो. 9922224889**

## पाकिस्तानपासून भारताला धोका

हा भारताला आपल्या अस्तित्वासाठी मोठा धोका मानत आहे. ही रणनीती पाकिस्तानची लष्करी विचारसरणी आणि सीमेवरील त्यांच्या आक्रमकतेला दर्शवत आहे. या रिपोर्टमधील उल्लेखानुसार पाकिस्तान मुख्यत्वेकडून चीनकडून मिळणाऱ्या आर्थिक आणि लष्करी मदतीवर अवलंबून आहे. चीनकडून मिळणारी साधनसामुग्री आणि तांत्रिक मदतीच्या आधारावर पाकिस्तान आपल्या लष्करी सामर्थ्यासोबतच आण्विक ताकदीचाही विस्तार करत आहे. तज्ज्ञांच्या मते, चीन आणि पाकिस्तानमधील ही आघाडी भारतासाठी सामरिकदृष्ट्या दुहेरी संकट निर्माण करत आहे. एकीकडे प्रत्यक्ष नियंत्रणरेषेवर चीनकडून येत असलेला दबाव आणि दुसरीकडे पाकिस्तानचा आण्विक ताकद वाढवण्याचा आणि सीमेपलीकडून अस्थिरता निर्माण करण्याचा डाव भारताचा तणाव वाढवणारा आहे.

## रशियाचे युक्रेनवर तीव्र हल्ले; १३ जणांचा मृत्यू

हल्ला करत आहे. या हल्ल्याला अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे जबाबदार आहेत, असा आरोप युक्रेनच्या अध्यक्ष झेलेन्स्की यांनी केला आहे. अमेरिका व जगाचे मौन हे पुतीन यांचे मनोबल वाढवत आहे. जगाच्या दबावाशिवाय काहीही होणार नाही, असे ते म्हणाले.

## प्रेमप्रकरणाच्या कबुलीने तेजप्रतापांची हकालपट्टी

लालूप्रसाद यादव म्हणाले की, खासगी जीवनात नैतिक मूल्यात घसरण झाल्यास सामाजिक न्यायाचा सामूहिक संघर्ष कमी होतो. माझ्या ज्येष्ठ मुलाचे वर्तन बेजबाबदारपणाचे, कौटुंबिक मूल्य व संस्काराचा ऱ्हास करणारे आहे. त्यामुळे मी पक्ष व कुटुंबापासून त्याला दूर करत आहे. आता पक्ष, कुटुंबात त्याला कोणतेही स्थान राहणार नाही. पक्षातून त्याला ६ वर्षांसाठी निलंबित केले आहे, असे लालूप्रसाद म्हणाले.

ते पुढे म्हणाले की, आपल्या वैयक्तिक जीवनात चांगले-वाईट, गुण-अवगुण आदींची निवड करण्याबाबत तो स्वतः सक्षम आहे. त्याच्याशी जे लोक संबंध ठेवतील त्यांनी ते स्वतःच्या जबाबदारीवर ठेवावेत. सार्वजनिक जीवनात मी कायमच लोकलज्जा बाळगली आहे. माझ्या कुटुंबातील लोकांनीही सार्वजनिक जीवनात त्याचे आचरण केले, असे लालूप्रसाद म्हणाले.

तेजप्रताप यादव यांनी शनिवारी फेसबुकवरून एक पोस्ट केली. त्यात तेजप्रताप यांचे एका मुलीसोबत छायाचित्र पोस्टमध्ये टाकले होते. गेल्या १२ वर्षांपासून या मुलीला मी ओळखतो. आम्ही दोघे प्रेम करतो. मला अनेक दिवसांपासून तुम्हाला ही बाब सांगायची होती. पण, कसे सांगू हे कळत नव्हते. त्यामुळे या फेसबुक पोस्टच्या माध्यमातून आपणास सांगत आहे. तुम्ही मला समजून घ्याल, अशी आशा आहे. ही पोस्ट नंतर तेजप्रताप यादव यांच्या अकाऊंटवरून काढून टाकण्यात आली. मात्र राजकीय वर्तुळात याची मोठी चर्चा सुरू झाली. केंद्रीय मंत्री जीतन राम मांझी यांनी लालूप्रसाद यादव यांच्यावर जोरदार टीका केली.

## हिंदू समाज सशक्त झाल्यावर भारतही मजबूत होईल

होणाऱ्या अत्याचारांविरुद्ध ज्या प्रकारचा संताप व्यक्त करण्यात आला आहे, तो यापूर्वी कधीही पाहिला गेला नव्हता. त्यामुळे आता तेथील स्थानिक हिंदूही म्हणतात, आम्ही पळून जाणार नाही. आम्ही इथेच राहू आणि आमच्या हक्कांसाठी लढू. आता हिंदू समाजाची अंतर्गत ताकद वाढत आहे. जगात कुठेही हिंदू असतील, तर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा आंतरराष्ट्रीय नियमांचे पालन करून त्यांच्यासाठी शक्य ते सर्व प्रयत्न करेल."

मोहन भागवत म्हणाले, "हिंदूंच्या प्रतिष्ठेतूनच भारताला गौरवप्राप्ती होईल. जे लोक आज स्वतःला हिंदू मानत नाहीत ते देखील कधीकाळी हिंदू होते. तरीदेखील त्यांना आपल्याबरोबर घेऊन पुढे जाण्याची क्षमता व इच्छा केवळ हिंदूंमध्येच आहे आणि हिंदू सुमदाय ती इच्छा दाखवत आला आहे. भारतातील हिंदू समाज एकवटला, सशक्त झाला तर जगभरातील हिंदूंना त्यातून बळ मिळेल."

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अध्यक्ष म्हणाले, "बांगलादेशातील हिंदूंवर अत्याचार होत आहेत. पूर्वीपासून ते होताहेत. परंतु, यावेळी त्याविरोधात जो संताप व्यक्त झाला, तो यापूर्वी कधीही पाहायला मिळाला नव्हता. हिंदू समाजाचे संघटन होत आहे. ही ताकद आणखी व्यापक होईल. हिंदू सुरक्षेचे ध्येय पूर्ण होईपर्यंत आपल्याला आपला लढा चालू ठेवावा लागेल."

## राज्यात पावसाचे धूमशान!

अरबी समुद्रात कमी दाबाचे क्षेत्र तीव्र होत असल्याने महाराष्ट्राच्या किनारपट्टी भागात मान्सूनचे आगमन झाल्याचे चित्र आहे. परिणामी कोकण किनारपट्टीसह मुंबईत मान्सूनपूर्व पावसाने जोरदार हजेरी लावली. सोमवारी रायगड आणि रत्नागिरीत अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे या दोन जिल्ह्यांना रेड अलर्ट जारी करण्यात आला असून किनारपट्टीवरील इतर भागांत ऑरेंज अलर्ट जारी आहे. तसेच कोल्हापूर आणि सातारा जिल्ह्यांच्या काही भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे, मुंबई, ठाणे, पालघर, नांदेड, लातूर आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये देखील पावसाचा अंदाज हवामान

पान १ वरून

विभागाकडून वर्तवण्यात आला आहे, तर मुंबई आणि ठाण्याला पावसाचा यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. बारामती जिल्ह्याला मान्सूनपूर्व पावसाने चांगलाच तडाखा दिला. बारामती तालुक्यात रविवारी सरासरी २२६.८७ मिलिमीटर एकूण पर्जन्यमानाची नोंद झाली. पावसाच्या पाण्याने रस्त्यांना नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले असून धान्यासह इतर वस्तूंचे मोठे नुकसान झाले आहे. मुसळधार पावसामुळे निरा खोऱ्यातील धरण क्षेत्रात पाणीसाठा वाढला आहे. पावसामुळे निरा डाव्या कालव्याचे आवर्तन बंद करण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला.

पुणे, सोलापूरमध्ये शनिवारपासून जोरदार पाऊस पडत असून पावसाच्या हाहाकाराने पुणे-सोलापूर महामार्गावरील एक इनोवा वाहून गेली आहे. सुदैवाने यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. बुलढाणा जिल्ह्यात रिमझिम पावसानंतर आता चांगलाच जोर पकडला आहे. बुलढाणा, खामगाव, नांदुरा व चिखली तालुक्यात दुपारपासून पावसाने धुव्वाधार बॅटिंग सुरू केली आहे. वाशिम जिल्ह्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या मान्सूनपूर्व पावसाने जनावरांसाठी साठवलेला चारा आणि खाद्य भिजून खराब झाले आहे, तर गोठा कोसळल्याने काही जनावरे जखमी झाली आहेत.

गेल्या दहा दिवसांपासून सुरू असलेल्या पावसाने चंद्रभागेची पाणीपातळी तब्बल एक मीटरने वाढली आहे. यामुळे पंढरपूरला २५ जूनपर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा बंधाऱ्यात जमा झाला आहे. गेल्या दहा दिवसांपासून सोलापूर जिल्ह्यात पावसाची जोरात बॅटिंग सुरू असून उजनी धरणात, तर चार टीएमसी एवढे पाणी जमा झाले आहे. सातारा जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे कोयना नदीवरील सर्व बंधारे ओव्हरफ्लो झाले आहेत, तर कराड तालुक्यातील खोडशी डॅम पूर्ण क्षमतेने भरल्याने तो ओव्हरफ्लो वाहू लागला आहे.

**तीन दिवसांत मुंबईत एंट्री**

पुढील तीन दिवसांत नैऋत्य मान्सून मध्य अरबी समुद्राच्या काही भागात, मुंबईसह महाराष्ट्राच्या काही भागात, कर्नाटकसह बंगळुरू, आंध्र प्रदेशचा काही भाग, तमिळनाडूचा उर्वरित भाग, पश्चिम मध्य आणि उत्तर बंगालच्या उपसागराच्या काही भागांत आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही भागांत पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे, अशी माहिती हवामान विभागाच्या वतीने देण्यात आली आहे. त्यामुळे येत्या तीन दिवसांत मुंबईतही मान्सूनचे आगमन होईल, असा अंदाज कुलाबा हवामान विभागाने वर्तवला आहे.

**सिन्नरमध्ये बसस्थानकाचा भाग कोसळला**

नाशिक जिल्ह्याला मान्सूनचा जोरदार फटका बसला. नाशिक ग्रामीणमध्येही दमदार पाऊस बरसत असून नद्या-नाल्यांना पूर आल्याचे चित्र आहे. त्यातच सिन्नरच्या हायटेक अशा बसस्थानकातील काही भाग कोसळला आहे. बसस्थानक रिकामा करण्यात आला असून शहरातील वाहतूक विस्कळीत झाली आहे.

**यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज**

यंदाच्या वर्षी राज्यात आणि देशभरात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, यंदा देशात १०७ टक्क्यांपर्यंत पाऊस पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. राज्यातही समाधानकारक आणि भरघोस पावसाची शक्यता असल्याने कृषी क्षेत्राला मोठा दिलासा मिळू शकतो.

## वादग्रस्ते विधाने टाळा; पंतप्रधानांचे नेत्यांना आदेश

पक्षाच्या प्रतिमेला धक्का बसत आहे. विजय शाह, जगदीश देवडा, रामचंद्र जांगड़ा आदी पहलगाम हत्याकांड व ऑपरेशन सिंदूरबाबत वादग्रस्त विधाने केली. त्यामुळे काँग्रेससहित विरोधी पक्षांनी पंतप्रधानांवर टीका केली. जात गणना ही मागास राहिलेल्या समाजाला मुख्य धारेत आणण्याचे काम करणार आहे. 'ऑपरेशन सिंदूर' यशस्वी झाल्याने देशाची संरक्षण क्षेत्रात स्वावलंबनाकडे वाटचाल सुरू आहे. स्वदेशी संरक्षण तंत्रज्ञान हे मारा करण्यासाठी अचूक आहे, असे सूत्र म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत रालोआच्या मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांनी ऑपरेशन सिंदूरमध्ये सैन्य दलाचे शौर्य व पंतप्रधान मोदींच्या साहसी नेतृत्वाचे कौतूक करणारा प्रस्ताव मंजूर केला.

भाजपचे अध्यक्ष जे. पी. नड्डा म्हणाले की, रालोआ जातीच्या राजकारणावर विश्वास ठेवत नाही. पण, जातगणनेमुळे मागास वर्गीयांना मदत मिळेल.

हा प्रस्ताव राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा यांनी मांडला तर शिवसेना नेते व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्याचे समर्थन केले. 'ऑपरेशन सिंदूर'मुळे भारतीयांचा आत्मविश्वास वाढला आहे, असे या प्रस्तावात नमूद केले.

## 'ऑपरेशन सिंदूर' हे बदलत्या भारताचे चित्र

भारतीय सैन्याने केलेल्या अचूक हल्ले हे भारताच्या क्षमतेचे प्रतिक आहे, असे ते म्हणाले.

ते म्हणाले की, भारतातील अनेक शहरात तरुणांनी नागरिकांच्या सुरक्षेसाठी स्वेच्छेने काम केले. अनेकांनी कविता लिहिल्या, संकल्प गीत म्हटले तसेच चित्र काढली. कटिहार व कुशीनगर शहरात अनेक कुटुंबानी आपल्या नवजात बालकांचे नाव 'सिंदूर' ठेवले. या मोहिमेचे यश भारताच्या संरक्षण क्षमतेचे आहे. सैनिकांचे शौर्य, भारतात बनलेली शस्त्रास्त्रे, उपकरण व तंत्रज्ञानाची मदत मिळाली, असे मोदी म्हणाले.

**गडचिरोलीतील गावात पहिल्यांदा बस पोहोचली**

महाराष्ट्रातील गडचिरोलीतील काटेझरी गावात पहिल्यांदाच बस पोहोचली आहे. गावात चांगले रस्ते होते. तरीही बस सेवा नव्हती. या गावातील लोक अनेक वर्षे वाट पाहत होते. जेव्हा गावात बस पोहचली तेव्हा गावातील नागरिकांनी ढोल-नगारे वाजवले. कारण या गावात माओवाद्यांचा संचार होता. आता या गावातील परिस्थिती बदलत आहे. या गावात आता मूलभूत सोयी-सुविधा पुरवल्या जात आहे. त्यामुळे गावकऱ्यांचे जीवन सुसह्य होणार आहे, असे मोदी म्हणाले.

**सिंहांची संख्या वाढली**

गेल्या पाच वर्षात गुजरातच्या गीर अभयारण्यात सिंहाची संख्या ६७४ वरून ८९१ झाली आहे. ही आकडेवारी उत्साहित करणारी आहे. प्राण्यांची गणना हे काम आव्हानात्मक आहे.

## मुंबई-पुणे महामार्गावरील अपघात घटले

परिवहन विभागाच्या अधिकाऱ्यांनुसार, जुलै २०२४ पासून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर आयटीएमएस ही प्रणाली लागू करण्यात आली होती. या प्रणालीची कठोर अंमलबजावणी सुरू झाली. महामार्गावर गस्त वाढवली तसेच जनजागृती मोहिमांमुळे अपघात कमी झाले आहेत.

**१७ नियम भंगाची कॅमेऱ्यात नोंद**

या आधुनिक आयटीएमएस प्रणालीतंर्गत वेगमर्यादा ओलांडणे, बेकायदेशीर पार्किंग, चुकीची दिशा, सीटबेल्ट न वापरणे, वाहन चालवताना मोबाईल वापरणे, आणि लेन कटिंग अशा १७ नियमभंगांची आधुनिक कॅमेरे आणि स्वयंचलित यंत्रणांद्वारे नोंद घेतली जाते. अतिरिक्त परिवहन आयुक्त भरत काळस्कर म्हणाले की, आयटीएमएसने अतिवेगाला चाप लावण्यात यश आले आहे. कारण या महामार्गावर लोक वेगाने वाहन चालवत होते. ते अपघातांच्या मुख्य कारणांपैकी एक असल्यामुळे मृत्यूंच्या प्रमाणातही घट झाली आहे. वाहकांना अनेक ई-चलने मिळाल्यानंतर ते वेगमर्यादा पाळतात. आयटीएमएसमुळे अतिवेग आणि लेन कटिंग कमी झाले आहे. वेग आणि मृत्यू याचा थेट संबंध असल्याने, नियंत्रणामुळे अपघातांचे प्रमाणही घसरले आहे," असे त्यांनी सांगितले.

मुंबई-पुणे द्रूतगती महामार्ग ९५ किमीचा आहे. हा देशातील पहिला प्रवेश-नियंत्रित सहा मार्गिकांचा महामार्ग आहे. तो आर्थिक राजधानीला पुण्याशी जोडतो.

७०१ किमी लांबीचा मुंबई-नागपूर दरम्यानचा समृद्धी महामार्ग आहे. सध्या नाशिक जिल्ह्यातील इगतपुरी ते नागपूरदरम्यान कार्यरत आहे. अंतिम टप्पा इगतपुरी ते ठाणे जिल्ह्यातील आमणे दरम्यानचा असून तो लवकरच सर्वसामान्यांसाठी खुला होण्याची शक्यता आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्य प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

१ २ ३ ४ ५ ६

दैनिक
महाराष्ट्र जीत
सोमवार दिनांक २६ मे 2025


## ग्रामीण विकासासाठी कटिबद्ध आमदार भावनाताई गवळी यांचे प्रतिपादन

### कळंबा महाली ते ब्राह्मणवाडा पांदण रस्त्याचे भूमिपूजन

महाराष्ट्र जीत

**वाशिम** (प्रतिनिधी)ग्रामीण भागातील जनतेने खासदारकीच्या काळात २५ वर्षे प्रचंड प्रेम दिले. देशाच्या विकासाचा केंद्रबिंदू म्हणजेच ग्रामीण विकास असून ग्रामीण भागातील शेतांना २४ तास जोडणारे रस्ते म्हणून पांदण रस्त्याची ओळख असून या रस्त्यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला असून ग्रामीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन अपराजित खासदार तथा विधान परिषद सदस्य आमदार भावनाताई गवळी यांनी केले आहे. त्या कळंबा महाली येथील एका कार्यक्रमात बोलत होत्या.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ रेखाताई संजय महाले या होत्या. प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख विजयराव खानझोडे, युवा सेना जिल्हा प्रमुख रवी भांदुर्गे, विद्यार्थी सेनेचे माजी जिल्हाप्रमुख बालासाहेब देशमुख, उपसरपंच श्रीमती गौकर्णाबाई महाले, मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष अशोकराव महाले, शिवसेना जिल्हा संघटक अनिल गरकळ, तालुका प्रमुख परम मुसळे, माजी पंचायत समिती सदस्य गजानन भुरभुरे, सुमित गोटे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी प्रशासक बंडू पाटील महाले आदी मान्यवरांची उपस्थिती होती.यावेळी कळंबा महाली ते ब्राह्मणवाडा या पांदण रस्त्याचे भूमिपूजन आमदार भावनाताई गवळी यांच्या हस्ते पार पडले.यावेळी माजी उपसरपंच बाबुराव महाले, कैलास महाले, हभप हरिभाऊ महाराज महाले आदींची उपस्थिती होती.कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश पाटील महाले यांनी केले होते.यावेळी आयोजित कार्यक्रमात आमदार गवळी यांचा गावकऱ्यांच्या वतीने सरपंच रेखाताई महाले व उपसरपंच गोकर्णाबाई महाले यांनी सत्कार केला. कार्यक्रमाचे संचालन वैद्यकीय सहायता जिल्हा प्रमुख भागवत सावके यांनी केले. प्रास्ताविक बंडू पाटील महाले यांनी केले.यावेळी सरपंच रामेश्वर हिरवे,अशोक चौरे,श्रीधर देशमुख किशोर देशमुख गजानन प्रभू,प्रवीण पट्टेबहादुर आदीं मान्यवर उपस्थित होते. यावेळी मोतीराम महाले,बाळकिसन महाले,दत्ता महाले,ह भ प गणेश महाराज महाले,गोविंदा महाले, पांडुरंग महाले रामा दिनाजी महाले, सुनील पाटील,गणेश महाले यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य व महिला मंडळी व गावकरी मंडळी यांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.




## अवैधरित्या अन्नधान्य विक्री

### पुरवठा विभाग व पनवेल तालुका पोलिसांची कारवाई

## शासकीय पुरवठा विभागाचे धान्य घरामध्ये

महाराष्ट्र जीत

**पनवेल ( वार्ताहर ):** पनवेल तालुक्यातील नेरेपाडा येथील एका घरामध्ये फोर्टीफाईड दाणे समाविष्ट असणारे सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वाटप होणाऱ्या तांदळाची व गव्हाची विक्री करण्यासाठी साठा केल्याचे आढळून आल्याने तहसीलदार पनवेल यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुका पोलिस व पुरवठा विभागाकडून कारवाई करण्यात आली आहे. पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिरुध्द गिजे यांना मिळालेल्या माहितीनुसार पनवेल तालुका हद्दीतील नेरेपाडा गावात राहणारे चंद्रहास कडू यांच्या कडे अधिकृत परवाना नसताना ते राहत असलेल्या घरी अवैधरित्या अन्नधान्य विक्री करीत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार गिजे यांनी ही माहिती पनवेल तालुका पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तहसीलदार यांना कळविली. पनवेल तहसीलदार व अप्पर तहसीलदार यांनी पनवेल पुरवठा विभागामधील पुरवठा निरीक्षक शिरीष शितोळे यांना कारवाई करण्याबाबत आदेश दिले होते. त्यानुसार शितोळे यांनी मंडळ अधिकारी नेरे यांनाही या कारवाईसाठी सोबत घेतले.

४२ धान्याच्या गोणी केल्या जप्त

या कारवाईमध्ये ४२ गोणी जप्त करण्यात आल्या असून त्या गोदामपाल, पनवेल शासकीय गोडावून पनवेलमध्ये सुरक्षित ठेवण्यात आल्या. यावेळी कडू यांच्यावर सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील वाटप होणारा साठा केल्याचे आढळून आल्याने अत्यावश्यक वस्तू अधिनियम १९५५ चे कलम ३, ७ अन्वये कारवाई केल्याची माहिती पनवेल शहर पोलिस ठाण्यात पुरवठा विभागाचे पुरवठा निरीक्षक शिरीष नंदकुमार शितोळे यांनी दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी कारवाई केली आहे. काही गोण्यांवर शासकीय पुरवठा विभागाचे स्टीकरत्यानुसार मंडळ अधिकारी नेरे एस.एस. पाटील यांनी कडू यांच्या घरामध्ये चौकशी केली असता घरामध्ये विनापरवाना सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटप होणाऱ्या तांदळाची व गव्हाची विक्री करण्यासाठी आणलेला साठा केले असल्याचे आढळून आले. तांदळाच्या गोणी मधील एफ. आर. के. तांदळाचे केरनेल आढळून आले. त्याचबरोबर काही गोण्यांवर लावण्यात आलेले स्टीकर हे शासकीय पुरवठा विभाग (भारतीय खाद्य निगम) यांचे असल्याचे तपासादरम्यान आढळून आले.

## मोहन दहीकर यांनी सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला..!

### पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल नेहमीच प्रयत्नशील राहिले, अग्रवाल यांची पुण्याला बदली

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी**



सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांची पुणे पोलीस अधीक्षक गुन्हे अन्वेषण विभाग पुणे येथे बदली झाली असून त्यांच्या रिक्त जागेवर सिंधुदुर्ग जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक म्हणून पोलीस उपआयुक्त ठाणे शहरांचे मोहन दहीकर रुजू झाले असून त्यांनी शनिवारी मावळते पोलीस अधीक्षक सौरभ अग्रवाल यांच्याकडून सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक म्हणून पदभार स्वीकारला आहे, पोलीस अधीक्षक सौरभ आग्रवाल यांनी 21 ऑक्टोबर 2022 रोजी सिंधुदुर्ग पोलीस अधीक्षक म्हणून कार्यभार स्वीकारला होता, जिल्ह्यात अग्रवाल हे कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नेहमीच यशस्वी ठरले, मोहन दहीकर हे देखील एक वरिष्ठ अधिकारी त्यांनी देखील विविध जिल्ह्यात आपल्या कामाची आगळीवेगळी छाप पडली आहे, धाराशिव रत्नागिरी सिंधुदुर्ग रायगड या पोलीस अधीक्षकांच्या देखील बदल्या करण्यात आल्या, राज्यांत गुरुवारी पोलीस अधीक्षक आणि पोलीस उप आयुक्त पदांवरील जवळपास 22 अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या होत्या.



## यंदा भांडुप परिसरात पाणी साचणार नाही!

### नालेसफाई वेगाने सुरू असल्याचा पालिकेचा दावा

**मुंबई :** गेल्या वर्षी अतिवृष्टी झाल्याने रेल्वे आणि रस्ते वाहतुकीवर मोठा परिणाम झाला होता. विशेषतः भांडुप उषानगर नाला, चुनाभट्टी, घाटकोपर, कुर्ला, विद्याविहार आदी सखल भागाच्या ठिकाणी पावसाचे पाणी साचून रेल्वे वाहतुकीवर परिणाम झाला होता. मात्र यंदा पालिकेतर्फे सदर ठिकाणी नालेसफाईची कामे जोरात सुरू आहेत. तसेच, पावसाचे पाणी साचण्यात आलेल्या अडचणी, त्रुटी या दूर करण्यात येत आहेत. अशी ग्वाही पालिका अधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिली असल्याची माहिती समोर आली आहे.

भांडूप येथे मध्य रेल्वेच्या ज्या ठिकाणी कल्व्हर्ट आहेत, ज्या ठिकाणी गतवर्षी अधिक पाऊस पडल्याने पाणी साचले त्या ठिकाणी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच, यंदा पाऊस वेळेआधीच सुरू झाला असला तरीही नालेसफाई वेळेत पूर्ण होईल असेही अधिकाऱ्यांनी सांगितल्याचे समजते. आतापर्यंत मोठ्या नाल्याची ८५ टक्के तर छोट्या नाल्यांची ६५ टक्केपर्यंत सफाई पूर्ण झाली आहे. महापालिकेने दरवर्षी पाणी साचणारी ठिकाणे निश्चित केली असून ४२२ ठिकाणी पंप लावले आहेत.

## पदविका आता चार फेऱ्यांमध्ये

### नव्या बदलाची यंदापासून होणार अंमलबजावणी

**मुंबई :** अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रम, वास्तुकला पदविका आणि बारावीनंतर हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका आणि औषधनिर्माणशास्त्र पदविका (डिप्लोमा इन फार्मसी) अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या आता तीनऐवजी चार प्रवेश फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या नव्या नियमाची अंमलबजावणी होणार आहे. या निर्णयानुसार विद्यार्थ्यांना आता चौथ्या फेरीनंतर चांगला पर्याय निवडण्याची संधी उपलब्ध होणार नाही.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या अखत्यारित प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. अभियांत्रिकी पदविका, थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका व प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेक्नॉलॉजी पदविका, सरफेस कोटिंग टेक्नॉलॉजी पदविका हे अभ्यासक्रम येतात. तर प्रथम वर्ष पोस्ट एस.एस.सी. वास्तुकला पदविका अभ्यासक्रम हा वास्तुकला परिषदेच्या अखत्यारित येतो. त्याचप्रमाणे प्रथम वर्ष पोस्ट एच.एस.सी. औषधनिर्माणशास्त्र पदविका हा अभ्यासक्रम फार्मसी कौन्सिल ऑफ इंडियाच्या अख्त्यारिमध्ये येतात. या अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये यंदा महत्त्वपूर्ण बदल करण्याचा निर्णय महाराष्ट्र राज्य तांत्रिक पदविका शैक्षणिक संस्था (प्रवेश) नियम, २०१९ या कायद्यांतर्गत घेण्यात आला आहे. त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाकडून यंदा राबविण्यात येणाऱ्या प्रवेश प्रक्रियेमध्ये हा महत्त्वपूर्ण बदल करण्यात येणार आहे.

पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेच्या आतापर्यंत तीन फेऱ्या राबवण्यात येत होत्या. मात्र शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून या अभ्यासक्रमांच्या चार फेऱ्या राबविण्यात येणार आहेत. दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या फेरीसाठी पात्र असलेल्या उमेदवाराने भरलेला पर्याय अर्जामध्ये बदल करण्याची सुविधा मिळणार आहे.

मागील फेऱ्यांमध्ये पर्याय अर्ज भरण्यात अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांना या चौथ्या फेरीमध्ये पर्याय अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध होणार आहे. फेरी वाढविण्यात आल्या या अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दिला मिळणार आहे.

### फेरीत करण्यात आलेले बदल



- एखाद्या उमेदवाराला दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत अनुक्रमे पहिल्या तीन आणि सहा पसंतीनुसार जागा मिळाली असेल, तर जागावाटप आपोआप गोठवण्यात येईल. स्वीकृतीनंतर उमेदवार त्यानंतरच्या फेऱ्यांमध्ये सहभागी होण्यास पात्र राहणार नाही. अशा उमेदवारांनी कागदपत्रांच्या पडताळणीसाठी एआरसीकडे हजर राहून कागदपत्रांची स्वत: छाननी करून ऑनलाइन पद्धतीने शुल्क भरावे. त्यानंतर जागा वाटप केलेल्या संस्थेत हजर राहून प्रवेश घ्यायचा आहे. जर उमेदवार एआरसीला हजर झाला नाही किंवा कागदपत्रांची तपासणी करण्यात अयशस्वी ठरल्यास त्याला वाटप केलेल्या जागेवरील त्याचा दावा आपोआप रद्द होऊन ती जागा पुढील प्रवेशासाठी उपलब्ध होणार आहे.
- दुसऱ्या आणि तिसऱ्या फेरीत उमेदवाराला पहिल्या तीन आणि सहा पसंतीक्रमांव्यतिरिक्त जागा मिळाल्यानंतर त्यांनी मिळालेल्या जागेवर प्रवेश घेतल्यास तो पुढील फेरीत सुधारणा करण्यासाठी पात्र राहील.
- चौथ्या फेरीनंतर उमेदवाराला पुढील कोणताही सुधारणा पर्याय उपलब्ध राहणार नाही. तसेच कार्यरत व्यावसायिकांसाठी दुसऱ्या फेरीनंतर पुढील कोणताही सुधारणा पर्याय उपलब्ध नसेल.

## आरोग्य संजीवनी

संकलन, उमेश पाटील

शेवगा

शेवगा ही एक शेंग भाजी आहे. दक्षिण भारतात आढळणारी ही वनस्पती खूप औषधी देखील आहे. या शेवग्याचे फायदे आणि गुणधर्म आज आम्ही तुम्हाला सांगणार आहोत.

शास्त्रीय नावः मॉरिंगा ओलेफेरा

हवामान – या झाडासाठी समशीतोष्ण आणि दमट वातावरण आवश्यक असते.

उंची – साधारण उंची १० मी. असते.

प्रमुख उपयोग – शेवग्याच्या शेंगा कालवण, कढी, आमटी किंवा सुकी भाजीत शिजवून खाल्ल्या जातात. या झाडाची पाने, फुले, फळं, साल, आणि मुळे या सर्वांचा उपयोग आयुर्वेदिक औषधे आणि नैसर्गिक उपचारात केला जातो. बियांपासून तेल सुद्धा काढले जाते आणि पानांपासून आपण भाजी बनवू शकतो. शेवगा हा हाडांसाठी वरदान आहे. यामध्ये कॅल्शिअम आणि प्रथिने जास्त प्रमाणात आढळतात. तसेच कार्बोहायड्रेट, पोटॅशिअम, आयर्न, मॅग्नेशिअम, व्हिटॅमिन ए, सी आणि बी अशी भरपूर जीवनसत्त्वे शेवग्यामध्ये आढळतात. कोवळ्या पानांची भाजी महाराष्ट्रात मृग नक्षत्रात केली जाते. पावसाळ्याच्या सुरुवातीला शरीरातील वातदोष वाढलेला असतो म्हणून ही भाजी तेव्हा आवर्जून खाल्ली जाते.

शेवग्याचे आयुर्वेदिक गुणधर्म –

१. हाडे मजबूत आणि निरोगी राहण्याकरिता शेवग्याची भाजी नियमित सेवन करावी.
२. वजन जास्त वाढले असल्यास शेवग्याच्या शेंगेचे सूप बनवून प्यावे. नियमित पिल्यास चरबीचे प्रमाण कमी झालेले दिसेल. याबरोबरच नियमित व्यायाम देखील करावा.
३. शारीरिक दौर्बल्य असल्यास शेवग्याच्या शेंगा नियमित आहारात घ्याव्यात.
४. तसेच संधिवात, नेत्ररोग, स्नायूंची कमजोरी या व्याधी देखील बऱ्या होतात.
५. शेवगा हा उष्ण आहे म्हणून त्याचा वात आणि कफ या प्रकारच्या विकारांवर उत्तम उपयोग होतो.
६. शेवगा हा उत्तम पाचक आहे. पोटातील पचनक्रिया व्यवस्थित होऊन रक्तप्रवाह सुधारतो.
७. शरीरावर किंवा शरीराच्या आतील भागात आलेली सूज शेवग्याच्या सालीच्या काढ्याने कमी होते.
८. डोकेदुखी व जडपणा यावर शेवगा अत्यंत गुणकारी आहे.
९. शेवगा जंतनाशक असल्याने पोटातील कृमी विष्ठेवाटे बाहेर पडतात.
१०. रक्तदोष, मुतखडा, उच्च रक्तदाब, मधुमेह या आजारांमध्ये शेवगा गुणकारी आहे.

**सौंदर्य खुलवण्यासाठी उपयोग** –

अनेक जीवनसत्त्वांची कमतरता शेवगा भरून काढतो. जसे अन्न तसे मन आणि शरीर, या उक्तीप्रमाणे तुम्ही शेवगा नियमित सेवन करत असाल तर तुमचे सौंदर्य खुलवण्यात नक्कीच सहयोग होईल. त्वचाविकार, थकवा, आणि डोळ्यांचे विकार यामध्ये शेवगा नियमित सेवन करा. नक्कीच लाभ होईल व शारीरिक कांती उजळेल.

## खारघर, तळोजा वसाहतीत उपद्रव; कुत्र्यांचा 94 जणांना चावा

महाराष्ट्र जीत

**पनवेल ( वार्ताहर ):**

खारघर आणि तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. रस्त्यावरून पायी चालत जाणाऱ्या व्यक्तींवर मोकाट कुत्र्यांचा कळप हल्ला करीत असल्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. विशेष म्हणजे वर्षभरात खारघर परिसरात ५४ जणांना तर तळोजा वसाहतीत ४० अशा ९४ जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद पालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झाली आहे. पालिकेकडून मोकाट कुत्र्यांचे निर्बिजीकरण मोहीम राबवली जात असताना, खारघर-तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांच्या संख्येत वाढ होत असल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजी पसरली आहे. खारघर आणि तळोजा वसाहतीत मोकाट कुत्र्यांचा सुळसुळाट झाला आहे. शहरातील मुख्य रस्त्यावर, गल्लीत टोळक्याने फिरणाऱ्या या कुत्र्यांमुळे लहान मुले, वृद्ध नागरिक तसेच दुचाकीवरून जाणाऱ्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. पालिका प्रशासनाकडून मोकाट कुत्र्यांचे निर्बीजीकरण करण्यासाठी एजन्सीची नेमणूक करण्यात आली आहे. निर्बीजीकरणामुळे कुत्र्यांची संख्या कमी होणे आवश्यक होते; मात्र त्यात वाढ होताना दिसून येत आहे. तळोजा वसाहतीत आजही कुत्र्यांची लहान लहान पिल्ले जागोजागी दिसून येतात. शहरातील वर्दळीच्या रस्त्यांवर भटक्या कुत्र्यांची टोळी खुले आम फिरत असल्याने शालेय विद्यार्थी, महिला, वृद्ध, व्यापारी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. गेल्या वर्षभरात खारघर परिसरात ५४ जणांना; तर तळोजा वसाहतीत ४० जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतल्याची नोंद पालिकेच्या आरोग्य विभागाकडून प्राप्त झाली आहे. शहरात वर्दळीच्या भागात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढला आहे. दिवस-रात्र मोकाट कुत्री रस्त्यावर टोळीने फिरतात. अनेकदा ही कुत्री पादचारी, दुचाकी, चारचाकी वाहनांच्या मागे जोरजोरात भुंकत पळतात. कधी कधी कुत्रे अचानक दुचाकीच्या आडवे आल्याने अनेक दुचाकीस्वार पडून जखमी झाले आहेत.

कुत्र्यांना डिवचण्याचे प्रकार अनेक वेळा मुले खेळताना दगड मारून पळ काढतात. काही सायकल, दुचाकीचालक दुचाकी चालवत असताना रस्ते आणि पदपथावर वसलेल्या कुत्र्यांच्या शेपटावरून वाहन घेऊन जातात. त्यावेळी असे प्रकार होत असतात. खारघरमधील जलवायू विहार सोसायटीत ६५० सदनिका असून, या सोसायटीत जवळपास ४०हून अधिक मोकाट कुत्र्यांनी सोसायटीचा ताबा घेतला आहे. रात्री-अपरात्री होणाऱ्या कुत्र्यांच्या आवाजामुळे रहिवाशांची झोप उडाल्याची तक्रार येथील रहिवासी करीत आहेत .

## पश्चिम महाराष्ट्रामध्ये सतत अवकाळी पाऊस, शेतकरी पेरणीच्या चिंतेत!

महाराष्ट्र जीत

**वार्ताहर**



गेले पाच ते सात दिवस सलग अवकाळी पाऊस पडत आहे. सकाळी ऊन दुपारी पावसाच्या ढगाची निर्मिती व सायंकाळी चार वाजल्यापासून पाऊस हा दिनक्रम चालूच आहे मे महिन्यातच अवकाळी पावसाने सातारा सांगली कोल्हापूर जिल्ह्यात अवकाळी पावसाने धुमाकूळ घातला आहे. पावसामुळे नदी ,नाले ,छोटे ,तलाव ओसंडून वाहू लागले आहेत. काही ठिकाणी तर तलावांना नद्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. पश्चिम महाराष्ट्रातील ग्रामीण भागामध्ये मे महिन्यात शेतकरी पावसाच्या अगोदर शेतकरी शेतीची मशागत दरवर्षी करत असतो. दरवर्षी या महिन्यात पाऊस पडल्यावर थोडा विश्रांती देतो .त्यावेळेस शेतकऱ्यांना शेतीची मशागत करण्यास वेळ भेटतो. याच कालावधीत ग्रामीण भागातील बहुतांश शेतकरी आपली पेरणी करत असतात व बाकीची पेरणी ही जून महिन्यात पाऊस चालू झाल्यानंतर होत असते पेरणी झाल्यामुळे शेतकरी समाधानी होत असतो. घाटमाथ्यावर अशाच प्रकारे पेरणी केली जाते व बागायती शेतीमध्ये पाऊस पडल्यानंतर पिकांची रोपे लावून लावणी केली जाते. यावर्षी एक वेगळी समीकरणे पावसाने बदलली आहेत.मे महिन्यात सततच्या अवकाळी पावसामुळे पावसाळ्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे. त्यातच हवामान खात्याच्या अंदाजानुसार मान्सून केरळमध्ये पाच ते सात दिवसात दाखल होणार आहे. त्यामुळे शेतकरी पाऊस कधी उघडणार व पेरणीस कधी सुरुवात करणार याची चिंता शेतकऱ्याला वाटू लागली आहे.

## पाऊस धारा

मनसोक्त बरसतात पाऊस धारा
चिंब चिंब भिजली वसुंधरा
गुज कानी काल सांगून गेला
अवखळ,खट्याळ रान वारा....

प्राजक्ताचा गंध दाहिदिशी पसरला
पाऊसधारा येती खाली झराझरा
पृथ्वीवरती फुलांचा सडा पडला
प्राजक्तावर पडती टपोऱ्या गारा ...

पाऊसधारात चिंब चिंब वसुधा
जोवर आहे अवनीवर पावसाळा
कोकीळ गाते गीत सुमधुर
पावसात तिचा खूप गोड गळा...

तुझ्याच प्रेमाखातर सजना बर
तुझ्यासाठी माझा प्रपंच सारा
बरसतात पावसाच्या चिंब धारा
अवघळ संवेदना माझ्या अंतरा....

**वसुधा वैभव नाईक, पुणे**

## प.पू बालयोगी काशिगिरी महाराज पुण्यतिथी निमित्ताने त्रिदिनी कीर्तन सोहळा मुर्डेश्वर केळगाव येथे कार्यक्रमाचे आयोजन

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी :- सिल्लोड:** मुर्डेश्वर संस्थांनचे पिठाधीश प.पू ब्रह्मलीन बालयोगी काशिगिरी महाराज यांच्या ०७ व्या पुण्यतिथी निमित्त मुर्डेश्वर केळगाव येथे त्रिदिनी कीर्तन उत्सव सोहळ्याचे आयोजन मुर्डेश्वर संस्थान केळगाव चे पिठाधीश प .पू ओमकारगिरी महाराज, सेवानिवृत्त प्राचार्य नामदेवराव चापे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले असून या कीर्तन सोहळ्याचा प्रारंभ दिनांक २६ मे रोजी होणार असून सांगता २८ मे रोजी होणार आहे.दिनांक २६ मे रोजी रात्री ०८.३० ते १०.३० ह.भ.प ज्ञानेश्वर महाराज शेलुदकर, दिनांक २७ मे रोजी समाजप्रबोधनकार ह.भ.प निवृत्ती महाराज इंदुरीकर,दिनांक २८ मे रोजी दुपारी १२. ते ०२. या वेळेत छत्रपती संभाजीनगर चे अतिरिक्त आयुक्त ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड यांचे काल्याचे कीर्तन संपन्न होणार आहे. या कार्यक्रमांसाठी १००८ महामंडलेश्वर दयानंद महाराज शेलगाव,प. पू गणेशानंद सरस्वती, सचिव आनंदा आखाडा त्र्यंबकेश्वर, स्वामी अखंडानंद गिरीजी महाराज, भवानीगड बीड, महंत नामदेव महाराज पल्हाळ शिवेश्वर देवस्थान वाकी, कृष्णगिरी महाराज कायगाव,१००८ महामंडलेश्वर सुखदेव महाराज वाकी यांच्यासह संत, महंत,कीर्तनकार आदी उपस्थित राहणार आहे.माजी मंत्री आ.अब्दुल सत्तार, मा. केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, खासदार, कल्याणराव काळे, आ.अनुराधा चव्हाण, माजी आमदार सांडू पाटील लोखंडे, यांच्यासह वैद्यकीय,प्रशासकीय, राजकीय,कृषी,शैक्षणिक,धार्मिक,अध्यात्मिक क्षेत्रातील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. तीन दिवस नियमित काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, मुर्डेश्वर महादेवाची आरती व पूजा,अभिषेक, हरिपाठ आदी विधी देखील संपन्न होणार आहे.सदर पुण्यतिथी सोहळ्यासाठी उपस्थित राहण्याचे आवाहन कार्यक्रमाचे संयोजक शिव शारदा शिक्षण प्रसारक मंडळ तथा अखिल भारतीय वारकरी महासंघाचे सचिव कृष्णा लहाने, माऊली वारकरी गुरुकुल आश्रम अनाथालय अनाथालय व गोशाळा चे संस्थापक अध्यक्ष रामेश्वर महाराज पवार, जय मुर्डेश्वर समस्त भक्त परिवार व स्थानिक भक्तमंडळी केळगाव परिसर यांच्यावतीने करण्यात आले आहे.



## अनवळे गावचा युवक अलोक वाळुंज याने मिळवली अमेरिकेतील "स्पेस युनिव्हर्सिटी"मधून एमएस पदवी

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी**

**खेड (पुणे)**

खेड तालुक्याच्या पश्चिम भागातील छोटेसे पण स्वाभिमानी गाव अनवळे येथील युवक अलोक सुभाष वाळुंज याने अमेरिकेतील न्यूयॉर्क येथील सुप्रसिद्ध स्पेस युनिव्हर्सिटी मधून मास्टर ऑफ सायन्स इन इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी ही पदवी संपादन करून गावाचा तसेच पाईट परिसराचा नावलौकिक वाढवला आहे. अलोक वाळुंज याच्या कुटुंबाची सामाजिक बांधिलकी ठसठशीत असून, त्यांच्या आईने दहा वर्षे वडिलांनी पाच वर्षे ग्रामपंचायतीमध्ये सरपंच पद भूषवले आहे. अशा कुटुंबातून आलेल्या अलोकने कठीण परिस्थितीमध्येही हार न मानता



स्वतःच्या शिक्षणासाठी पार्ट टाइम नोकरी करून खर्च उचलला. त्याने स्वतःच्या मेहनतीने व जिद्दीने अमेरिकेत उच्च शिक्षणासाठी वाटचाल केली. अमेरिकेत स्थायिक असलेल्या काही भारतीयांनी अलोकच्या प्रगतीला हातभार लावून त्याला योग्य मार्गदर्शन दिले. या सहकार्यामुळे अलोकला जागतिक स्तरावर आपली शैक्षणिक गुणवत्ता सिद्ध करता आली आणि त्याने आपल्या परिसराचा गौरव वाढवला. या यशामुळे अनवळे ग्रामस्थांसह पाईटच्या पश्चिम भागात अलोक वाळुंज याचे मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक होत आहे. त्यांच्या या यशामुळे अनेक युवकांना प्रेरणा मिळणार असून, ग्रामीण भागातूनही आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचता येते, हे त्यांनी सिद्ध केले आहे.

## शिवमावळे सामाजिक सेवा संघाच्या वतीने विविध सेवांचे शिबिर आयोजन

पुणे प्रतिनिधी शामराव.जगताप

महाराष्ट्र जीत

शनिवार दिनांक 17/05/2025 ते रविवार दिनांक 18/05/2025 रोजी शिवमावळे सामाजिक सेवा संघाच्या वतीने संस्थापक / अध्यक्ष मा. दिनेश तात्याबा घोलप सर यांच्या मार्गदर्शनाने तसेच उप अध्यक्ष :- मा. पुरुषोत्तम घाग सरांच्या सुचनेने, कुर्ला तालुका अध्यक्ष मा. हर्षल प्रकाश जाधव यांच्या उपस्तिथीत मतदान कार्ड, जेष्ठ नागरिक कार्ड, ई श्रम कार्ड, पॅन कार्ड ची शिबीर राबविण्यात आली. या कार्यक्रमास खालील मान्य वरांची उपस्तिथी लाभली. मा. ना. श्री. विनोदजी साडविलकर साहेब. रुग्ण मित्र., मा. ना. श्री. किरणजी साळवे साहेब. शौर्य बहुउद्देशीय सेवाभावी संस्था (संस्थापक / अध्यक्ष). रुग्ण मित्र. तसेच विशेष सहकार्य : मा. ना. श्री. नागेशजी काटकर साहेब. मा. ना. श्री. राजेशजी भोंडवे साहेब. (विशेष कार्यकारी अधिकारी). जिल्हा : मुंबई, उपनगर.लाभले या भागातील सर्व नागरिक व जेष्ठ मंडळींनी या शिबिराचा भरपूर फायदा घेतला





## 'व्हॉईस ऑफ मीडिया' देणार प्रशिक्षण

### पत्रकारिता आणि संघटनात्मक बांधणीवर दोन दिवसीय अभ्यासपूर्ण सत्रांचे शिर्डीत आयोजन
### राज्यभरातून सहभागी होणार व्हॉईस ऑफ मीडियाचे पदाधिकारी

महाराष्ट्र जीत

**मुंबई (केतन भोज)** – राज्यातील पत्रकारांच्या व्यावसायिक क्षमतेत वाढ करण्याच्या उद्देशाने 'व्हॉईस ऑफ मीडिया' या पत्रकार संघटनेच्या वतीने दिनांक ३१ मे व १ जून २०२५ रोजी शिर्डी येथील आत्मा मलिक इंटरनॅशनल स्कूल येथे दोन दिवसीय राज्यस्तरीय निवासी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. "बदलती पत्रकारिता आणि संघटनात्मक बांधणी" या मुख्य विषयाभोवती फिरणाऱ्या या कार्यशाळेत विविध क्षेत्रातील नामवंत संपादक, अभ्यासक आणि व्यावसायिक तज्ज्ञ आपले मार्गदर्शन करणार आहेत. कार्यशाळेचे उद्घाटन शनिवार, ३१ मे रोजी सकाळी ९ वाजता होणार आहे. य ा उद्घाटन सोहळ्यास संत परमानंद महाराज, विश्वात्मक जंगलीदास महाराज ट्रस्टचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, ना. राधाकृष्ण विखे, खासदार भाऊसाहेब वाकचौरे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे आणि आमदार अमोल खताळ हे मान्यवर उपस्थित राहणार आहेत. पहिल्या दिवशी दै. पुढारी, पुणेचे संपादक सुनील माळी हे "ग्रामीण पत्रकारिता" या विषयावर आपले विचार मांडतील. त्यानंतर ज्येष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे आणि चपराक, पुणेचे संपादक घनश्याम पाटील हे अनुक्रमे "बातमीदारी आणि साहित्य" व "पत्रकारितेचे बदलते स्वरूप" यावर सखोल मार्गदर्शन करतील.दुसऱ्या दिवशी व्यावसायिक मानसिकता विकास तज्ज्ञ गगन महोत्रा, वजीर मीडिया हाऊसच्या संचालिका स्मिता गुणे व अभिनव शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मधुकर नवले यांच्या सत्रांमध्ये "महिला पत्रकारिता : मार्केटिंग एक उद्योग", "समाजाची पत्रकारितेकडून अपेक्षा" या विषयांवर विचारमंथन होणार आहे.या कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या प्रत्येक प्रतिनिधीसाठी मोफत सर्व रोग निदान शिबीर आणि हेल्थ कार्ड देण्यात येणार आहे. याच कार्यशाळेदरम्यान आत्मा मलिक मल्टी सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल आणि व्हॉईस ऑफ मीडिया यांच्यातील सहकार्य कराराची औपचारिक घोषणा देखील करण्यात येईल. या उपक्रमात व्हॉईस ऑफ मीडियाच्या प्रदेश अध्यक्ष अनिल मस्के, कार्याध्यक्ष अजित कुंकुलोळ, सरचिटणीस डिगंबर महाले, महिला प्रदेशाध्यक्ष रश्मी मारवाडी आणि सविता चंद्रे (ग्रामीण) यांनी सर्व पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन केले आहे.

## मानोरा शहरातील वार्ड क्र. 13 मध्ये नागरिकांचे जगणे कठीण – 20 वर्षांपासून वसाहत असूनही रस्ता व नाल्यांचा अभाव, साचलेल्या पाण्यामुळे रोगराईचा धोका

महाराष्ट्र जीत

मानोरा (विक्रांत शिरसाट ) – मानोरा शहरातील वार्ड क्रमांक 13 मध्ये गेल्या 20 वर्षांपासून वसाहत अस्तित्वात असतानाही आजतागायत त्या परिसरात ना पक्के रस्ते बनवण्यात आले आहेत, ना नाल्यांची सुविधा करण्यात आलेली आहे. परिणामी पावसाचे अथवा सांडपाण्याचे पाणी रस्त्यावर साचून राहत असून, नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. सदर वसाहतीमध्ये पावसाच्या पाण्याबरोबरच घरगुती सांडपाणीही रस्त्यावर जमा होत असून, डासांची उत्पत्ती, दुर्गंधी आणि रोगराईचा मोठा धोका निर्माण झाला आहे. रात्रीच्या वेळी पाणी साचलेल्या रस्त्यावरून चालणेही अशक्य झाले असून, अपघाताचा धोका वाढत आहे. स्थानीय नागरिकांनी यासंदर्भात नगर पंचायत मानोराला लेखी निवेदन देऊन या समस्येकडे लक्ष वेधले आहे. "वसाहत अस्तित्वात असूनही मूलभूत सुविधा न मिळाल्यास नगर पंचायत नेमकं करते तरी काय?" असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे. प्रशासनाने तात्काळ या भागात नाल्यांचे व रस्त्याचे काम सुरू करावे, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.





## शिवाकोरड्याचीमेट गावाचा रस्ता खड्ड्यांनी भरलेला – रस्ता मंजुरी असूनही काम सुरू नाही, पावसाळ्यात होणार हाल

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत : दयानंद शिंदे**

**जव्हार:- तालुक्यातील** – शिवाकोरड्याचीमेट गावाचा मुख्य रस्ता सध्या अत्यंत वाईट अवस्थेत असून, सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. काही ठिकाणी रस्त्यावरील खडी उखडून बाहेर आली असून चिखल आणि पाण्यामुळे वाहतूकही धोकादायक बनली आहे. हा रस्ता शासनाकडून मंजूर झाला असूनही प्रत्यक्षात कोणतेही काम सुरू झालेले नाही, त्यामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. हा रस्ता शिवाकोरड्याचीमेट गावाला आणि मोखाडा-जव्हार तालुक्याच्या ठिकाणी जोडतो. विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी, शेतकऱ्यांना माल नेण्यासाठी, रुग्णांना दवाखान्यात पोहोचवण्यासाठी आणि सामान्य नागरिकांना बाजारासाठी याच रस्त्यावरून प्रवास करावा लागतो. पण रस्त्याची अवस्था इतकी बिकट झाली आहे की दोन चाकी आणि चार चाकी वाहनेही घसरून अपघात होण्याची शक्यता वाढली आहे. "रस्ता मंजूर झाल्याचे फक्त कागदावर दिसतेय. प्रत्यक्षात खड्ड्यांतून प्रवास



करावा लागतोय. उन्हाळ्यातही काही झाले नाही, आता अवकाळी पावसात परिस्थिती बिकट झाली आहे,"तर पुढे पावसाळा ऋतूत परिस्थिती आणखीच बिकट होईल अशी भावना गावकऱ्यांनी व्यक्त केली. खड्डे, उखडलेली खडी, पावसाचे पाणी आणि प्रशासनाचे दुर्लक्ष– हे सर्व मिळून सामान्य नागरिकांना रोज नाहक त्रास सहन करावा लागत आहे. रुग्णवाहिका वेळेवर पोहोचत नाही, विद्यार्थ्यांचा प्रवास धोकादायक बनतोय, आणि शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. ग्रामस्थांनी प्रशासनाकडे जोरदार मागणी केली आहे की, तातडीने रस्त्याच्या दुरुस्तीकडे लक्ष द्यावे, अन्यथा आंदोलनाचा इशारा दिला जाईल.

## खेर्डा बु॥ या चौफुली स्टॅन्डला जलद अतिजलद एसटीचा थांबा द्यावा .

### प्रवाशी वर्गाची मागणी .

महाराष्ट्र जीत

**नकुल उपाध्ये / कारंजा लाड:** कारंजा तालुक्यातील कारंजा -मुर्तीजापूर व अमरावती पिंजर रोडची चौफुली असलेल्या खेर्डा बु॥ स्टॅन्ड वर जलद अतिजलद एस टी बसेसला थांबा नसल्याने प्रवाशी वर्गाची मोठी गैरसोय होत आहे . कामरगांव प्रमाणे खेर्डा बु॥ येथे जलद अती जलद एसटी बसेसला थांबा देऊन सर्वसामान्य प्रवाशी वर्गाची मागणी जोर धरत असल्याने या प्रकरणी आमदार सईताई डहाके यांनी लक्ष घालावे अशी विनंती सरपंच संघटणेचे कारंजा तालुका अध्यक्ष नितीन पाटील उपाध्ये यांनी कारंजा मानोरा मतदार संघाचे आमदारांकडे केली आहे . वृत्त असे की कारंजा ते मुर्तीजापर व अमरावती ते पींजर या रोडची चौफुली खेर्डा बु॥ एसटी स्टन्ड आहे येथे पंचक्रोशीतील सर्वसामान्य प्रवाशी नेहमीच एसटी ची तासनतास प्रतीक्षा करतात . जलद अतिजलद एसटी बसेस या थांब्यावर थांबत नसल्याने नाईलाजाने त्यांना जीव धोक्यात घालून प्रवाशी ऍटो कीवा अवैद्य खाजगी



वाहनाने प्रवास करावा लागतो . कारंजा आगराची एसटी बस सोडली तर अमरावती वाशिमकडे जाण्यासाठी इतर आगराच्या एसटी बसेस या थांब्यावर थांबत नाही . कामरगांव प्रमाणे कोणत्याही आगराची जलद अतिजलद बस खेर्डा बु॥ या चौफुली स्टॅन्डवर थांबावी व पंचक्रोशीतील सर्वसामान्य प्रवाशी वर्गाला दिलासा द्यावा अशी विनंती आमदार कारंजा मानोरा मतदार संघ यांचेकडे प्रवाशी जनतेची असल्याचे खेर्डा येथील ओमप्रकाश जैस्वाल यांनी केली आहे .

## जेजुरी मार्गावर रस्त्यावर रुग्णवाहिकेच्या धडकेने अनोळखी व्यक्तीची मृत्यू.

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शामराव जगताप**

जेजुरी मोरगाव रस्त्यावर दिनांक 24 रोजी रात्री पाउने अकरा. वाजण्याच्या सुमारास रुग्णवाहिकेची जोरदार धडक बसल्याने एका 50 वर्षीय अनोळखी व्यक्तीचा मृत्यू झाला. याबाबत जेजुरी पोलिसांनी दिलेली माहिती अशी की,शनिवार दिनांक 24 रोजी रात्री 10 वाजून 45 मिनिटांच्या दरम्यान मोरगाव कडून जेजुरी कडे भरधाव वेगाने जाणाऱ्या रुग्णवाहिकेने एका अनोळखी व्यक्तीला जोरदार धडक दिली. या धडकेने सदर इसम 15 ते 20 फूट अंतरावर पासून गंभीर जखमी झाला. उपचारापूर्वीच सदर अनोळखी व्यक्तीची मृत्यू झाला. अपघाता नंतर रुग्णवाहिकेचां चालक निघून जात असताना येथील नागरिकांनी पोलिसांना फोन करून या चालकाला पोलिसांच्या ताब्यात दिला. चालक अक्षय मोहन मोरे वय 26 रा मुरटी ता बारामती यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. या अपघात प्रकरणी पोलीस हवालदार नंदकुमार पिंगळे तपास करीत आहेत. सदर अनोळखी मयत व्यक्ती बाबत कोणास माहिती असल्यास जेजुरी पोलीस स्टेशन मध्ये संपर्क साधावा असे आवाहन जेजुरी पोलिसांनी केले आहे.

## शेतकऱ्यांनी अधिकृत कृषी केंद्रातुनच खत, बियाणे खरेदी करावे:- कृषी अधिकारी नारनाळीकर

### मुखेड कृषी विभागाचे शेतकरी बांधवांना आवाहन !
### बोगस बियाणे व खते विक्रीचा बाब निदर्शनास आल्यास तात्काळ कृषी कार्यालयाशी संपर्क साधा

महाराष्ट्र जीत

**महाराष्ट्र जीत दिलीप मादाळे**

चालू वर्षातील खरीप पिकांसाठी तालुक्यातील समस्त शेतकऱ्यांनी खात, बियाणे व कीटकनाशके खरेदी करताना फसवणूक होऊ नये यासाठी शासन मान्यता कृषी निविष्ठाचा विक्री परवाना असलेल्या कृषी केंद्रातूनच खरेदी करावे असे आवाहन कृषी विभागाचे मुखेड तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर यांनी केले आहे. मुखेड तालुक्यासह मुक्रमाबाद, बाराहाळी, जांब परिसरातील सर्व शेतकरी बांधवांना कृषी विभागाकडून आवाहन करण्यात येते की, खरीप हंगाम तोंडावर आलेला असून या हंगामाकरीता लागणाऱ्या सर्व कृषीनिविष्ठा (सर्व प्रकारचे बियाणे, खते, औषधी) इत्यादी निविष्ठा तालुक्यातील अधिकृत परवानाधारक कृषी




सेवा केंद्र यांच्याकडूनच खरेदी करावे व खरेदी केलेल्या निविष्ठाची अधिकृत बिल पावती घ्या वमहत्त्वाचे, म्हणजे बाहेर राज्यातील, बाहेर जिल्ह्यातील किंवा बाहेर तालुक्यातील कुठल्याच अनधिकृतएजंट मार्फत खरीप हंगामा करिता लागणाऱ्या कृषी निविष्ठाची (सर्व बियाणे, खते, औषधी) इत्यादी निविष्ठांची खरेदी करू नये. कारण सदरी कृषी निविष्ठा ही निकृष्ट दर्जाची राहू शकते त्यामुळे बियाणेउगवण बाबत, खाते व औषधी यांची पिकाकरिता पुरेसा उपयोग न होणे. याबाबतीत तक्रारी येऊ शकतात. त्यामुळे उत्पादनात घट होऊन परिणामी आपले आर्थिक नुकसान होऊ शकते. शेतकऱ्यांनी रासायनिक खते, बियाणे व कीटकनाशके खरेदी करताना अधिकृत व परवानाधारक विक्रेत्याकडूनच खरेदी करावी. यासाठी पक्क्या बिलाचाच आग्रह धरावा. विक्रेता पक्के बिल देण्यास नकार देत असल्यास किंवा इतर कुठलीही शंका तक्रार असल्यास तालुका कृषी अधिकारी, किंवा पंचायत समितीचे कृषी अधिकारी यांच्याकडे संपर्क साधून तक्रार नोंदवावी. बिलावर खरेदी केलेल्या बियाण्याच्या गुणवतेचा संपूर्ण तपशील नोंदविलेला आहे क्रिया नाही याची खात्री करावी. खरेदी केलेल्या बियाण्याचे पॉकीट सीलबंद , मोहरबंद तथा लेबलसह असल्याची खात्री करावी. बियाण्याच्या उगवण क्षमतेचा अंतिम मुदतीचा दिनांक पाहूनच पॉफीट किया बैंक खरेदी करावी. एमआरपी पेक्षा जास्त किमतीने विक्री होत असल्यास त्वरित कृषी विभागाकडे तक्रार नोंदवावी. रासायनिक खत खरेदी करताना बॅग वरील एमआरपी किमत बघूनच खरेदी करावी. जर कोणताही व्यक्ती अथवा संस्था बेकायदेशीर पद्धतीने बोगस बियाण्याची, खताची विक्री करताना आढळल्यास त्याच्याविरुद्ध बियाणे नियंत्रण आदेश १९८३ रासायनिक खत नियंत्रण आदेश १९८५ अंतर्गत तरतुदीप्रमाणे कारवाई केली जाईल. अशी बोगस बियाणे व खते विक्रीचा बाब शेतकऱ्यांच्या निदर्शनास आल्यास तात्काळ कृषी कार्यालयाशी संपर्क साधावा गैरप्रकार आढळल्यास त्वरित तक्रार करा असे आवाहन मुखेड तालुका कृषी अधिकारी विकास नारनाळीकर यांनी केले आहे.

## स्थानिक गुन्हे शाखेची कामगीरी दिवसा घरफोडीचे ०७ गुन्हे उघड.

### आंतरराज्यीय,अंतर जिल्हा टोळीतील दोन आरोपीच्या आवळल्या मुसक्या

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** पोलीस घटकामध्ये जिल्हा पोलीस अधिक्षक श्री अनुज तारे यांनी पदभार स्विकारल्यापासुन त्यांनी संपत्ती विषयक तसेच इतरही गुन्हे घडणार नाहीत, त्याला प्रतिबंध होईल याकरीता विशेष प्रतिबंधक उपाययोजना राबविल्या. त्याकरीता सतत पेट्रोलींग, वेळोवेळी ऑपरेशन ऑल आउट, कोंबीग ऑपरेशन व नाकाबंदी सारख्या विशेष माहिमा राबवुन रेकॉर्डवरील व माहितगार गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन आरोपीतांविरुध्द प्रभावी प्रतिबंधक कार्यवाहया करण्यात आल्या. परीणामी मागील काही वर्षाचे तुलनेत गुन्हयांमध्ये घट आली आहे.मालमत्तेचे गुन्हे घडलेच तर घडलेल्या गुन्हयांना उघडकीस आणण्यावर भर दिला. त्याकरीता योजना आखल्या विशेष प्रयत्न केले, केलेले सर्व प्रयत्नांचा अहवाल मागवुन सतत आढावा घेतला. संपत्तीविषयक गुन्हे उघडकीस आणण्याकरीता स्थानिक गुन्हे शाखेला सुचना/आदेश दिले.




त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेने घडलेल्या गुन्हयांच्या तांत्रीक बाबी तपासुन विश्लेषनात्मक अभ्यास केला. गुन्हेगारांचे रेकॉर्ड, सिसिटीव्ही फुटेज बघुन आरोपींनी घरफोडीकरीता वापरलेल्या पध्दतींचा अभ्यास केल्याने त्यावरुन असे लक्षात आले की, बुलढाणा जिल्हयातील विशीष्ट भागातील घरफोडीचे गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळया वाशिम, अकोला, अमरावती, बुलढाणा, परभणी, बिड, नाशिक, जळगाव, चाळीसगाव असे महाराष्ट्रातील व मध्यप्रदेश येथील काही जिल्हयांमध्ये सक्रीय आहे. त्यावरुन मागील दोन महिण्यापासुन घरफोडीचे गुन्हेगारांवर सतत पाळत ठेवुन त्यांच्या प्रत्येक हालचालीवर लक्ष ठेवल्या जात होते. आरोपींना पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे सतत प्रयत्न चालुच होते.दि.२४.०५.२०२५ रोजी घरफोडीचे गुन्हे करणारे आंतरराज्य टोळीतील गुन्हेगार मालेगाव येथे येत असल्याच्या मिळालेल्या गोपणीय बातमीप्रमाणे अकोला नाका, मालेगाव येथे सापळा रचुन संशयीत इसम १) आकाश प्रकाश पवार वय ३५ वर्ष २) उमेश गटरंग पवार वय २८ वर्ष दोन्ही रा. फत्तेपुर, ता. खामगाव, जि. बुलढाणा यांना कमालीचे प्रयत्न करुन ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी पो.स्टे.वाशिम येथील अप.क्र. ११२/२५ अप.क्र. २३९/२५ अप.क्र. ४१७/२५ अप.क्र. ७५३/२४ पो.स्टे. रिसोड येथील अप.क्र. ५८१/२४ अप.क्र.१८५/२४ अप.क्र. ७६/२४ असे एकुण ०७ गुन्हे त्यांच्या इतर साथीदारासह केल्याची कबुली दिल्याने आरोपीतांकडुन एकुण ५१.२७ ग्रॅम वजनाच्या ०४ सोन्याच्या लगड व १७ तोळे वजनाच्या ०३ चांदीच्या लगड व नगदी १६,००० रुपये असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.घरफोडीचे गुन्हे करणारे आंतरराज्य टोळीतील कुख्यात आरोपी पोलीसांनी पकडुन एकावेळी ०७ घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणे व त्या गुन्हयांमधील चोरीस गेलेली मालमत्ता हस्तगत करणे ही वाशिम जिल्हा पोलीसांकरीता मोठया यशाची व अभिमानाची बाब आहे. इतर जिल्ह्यातील व इतर राज्यातील 20 ते 22 गुन्हे केले असल्याचे कबुली दिली आहे. सदर आरोपी अनेक जिल्ह्यांना हवे होते ते सापडत नव्हते. मात्र वाशिम जिल्हा पोलीस कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत घेऊन या आरोपींच्या अखेर मुसक्या आवळल्या.सदर कारवाई मा. श्री अनुज तारे, पोलीस अधिक्षक वाशिम, मा. श्रीमती लता फड, अपर पोलीस अधिक्षक, वाशिम, मा. श्री नवदीप अग्रवाल, सहायक पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शनात पोनि स्थागुशा श्री रामकृष्ण महल्ले, सपोनि योगेश धोत्रे, व अंमलदार विनोद सुर्वे, ज्ञानदेव म्हात्रे, अमोल इरतकर, आषिश बिडवे, अविनाश वाढे, शुभम चौधरी, दिपक घुगे, संतोष कंकाळ, संतोष वाघ यांनी सतत कार्यरत राहुन अथक परिश्रम घेवुन गोपनिय माहिती मिळवुन केलेल्या तांत्रीक तपासामुळेच गुन्हे उघडकीस आले आहेत, याबाबत वरीष्ठ पातळीवर सुध्दा दखल घेण्यात आली आहे.

## उकळी पेन परिसरात अवकाळी पावसाचे थैमान.

### भुईमूग लावगड शेतकऱ्यांचे आर्थिक मोठे नुकसान संबंधित विभागाने तात्काळ पंचनामा करण्याची शिवसेना उपतालुकाप्रमुख गजानन जैताडे पाटील यांची मागणी

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** वाशिम येथून जवळच असलेल्या उकळीपेन परिसरात गेल्या दोन-तीन दिवसापासून चालू असलेल्या सदस्य अवकाळी पावसामुळे भुईमूग लागवड केली असलेल्या उन्हाळी पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे. भुईमूग हे उन्हाळी पीक असल्यामुळे या परिसरात अनेक शेतकऱ्यांनी भुईमूग पिकाची लागवड केलेली अवकाळी पावसामुळे पूर्ण पाण्यात भिजलेले आहेत यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झालेले आहे. या सदर गंभीर बाबीची संबंधित विभागाने दखल घेऊन तात्काळ पंचनामे करून नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याची मागणी शिवसेना (उबाठा)पक्षाचे उपतालुका प्रमुख गजानन जैताडे पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकातून मागणी केली आहे. पुढे बोलताना गजानन जयताडे पाटील म्हणाले







आहे हे पीक सध्या काढणीला आलेले आहे. हाता तोंडाशी आलेला हा घास मात्र या अवकाळी पावसामुळे हिरावून घेतला जातो की काय? अशी परिस्थिती निर्माण झालेली आहे.भुईमूग पीक काही शेतकऱ्यांची अजूनही शेतात जसेच्या तसे आहे हे पीक काढणीला आलेले आहे.मात्र पाऊस असल्यामुळे हे पीक काढण्याला मोठा विलंब होत आहे हा विलंब होत असल्यामुळे या भुईमूग पिकाच्या शेंगाला देखील कोंब फुटत असल्याचे चित्र दिसत आहे.ज्या शेतकऱ्यांची शेंगा वाळणीला टाकलेले आहेत त्या शेंगा देखील या की, शेतकऱ्यांच्या हातात तोंडाशी आलेला घास या अवकाळी पावसाने जवळपास हिरावून घेतलेला आहे. म्हणून त्या शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले आहे.या बाबीची कृषी विभागांनी तसेच संबंधित इतरही लोकप्रतिनिधी यांनी वरिष्ठ पातळीवर हा विषय मांडून उकळीपेन परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांच्या अतोनात नुकसान याबाबत शासनाला अवगत करावे अशी मागणी देखील गजानन जैताडे पाटील यांनी केली आहे.

दैनिक
# महाराष्ट्र जीत



## प्रतिनिधी नेमणे आहे

संपूर्ण महाराष्ट्रात **"दैनिक महाराष्ट्र जीत"** या अल्पवधी लोकप्रिय झालेल्या दैनिक वृत्तपत्रास काम करावयास सुवर्णसंधी आता प्रत्येक जिल्ह्यात व तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे नवनिर्वाचित प्रतिनिधी छायाचित्रकार लेखक जाहिरातदार नेमणे आहे चला संधीचा फायदा...

### संपर्क

मुख्य संपादक :
**सागर राणा अंभोरे**
मो. 99210 45121

संपादक :
**बंडूभाऊ इंगोले**
मो. 96044 30002

**ड्रॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौक कारंजा जी. वाशीम**